भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# कीटनाशके अधिनियम, १९६८

(१९६८ चा अधिनियम क्रमांक ४६)

[१ जून, १९७८ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Insecticides Act, 1968

**(Act No. 46 of 1968)**

*[As in force on the 1st June, 1978]*

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
(१९८२)
[किंमत—रु. १.७०]

## विशोधन अधिनियमांची सूची

१. ‘ कीटनाशकें (विशोधन) अधिनियम, १९७७ ’ (१९७७ चा २४).

# कीटनाशके अधिनियम, १९६८

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. अन्य कायदे लागू होण्यास आडकाठी नाही.
३. व्याख्या.
४. केंद्रीय कीटनाशकीय मंडळ.
५. नोंदणी समिती.
६. इतर समित्या.
७. मंडळाची कार्यपद्धती.
८. सचिव व इतर अधिकारी.
९. कीटनाशकांची नोंदणी.
१०. नोंदणी न करण्याविरुद्ध किंवा ती रद्द करण्याविरुद्ध अपील.
११. केंद्र शासनाची पुनरीक्षणाची शक्ती.
१२. लायसन अधिकारी.
१३. लायसने देणे.
१४. लायसनांचे प्रत्याहरण, निलंबन व विशोधन.
१५. लायसन अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध अपील.
१६. केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळा.
१७. विवक्षित कीटनाशकांची आयात व निर्मिती यांना मनाई.
१८. विवक्षित कीटनाशकांची विक्री, इत्यादींस मनाई.
१९. कीटनाशकीय विश्लेषक.
२०. कीटनाशकीय निरीक्षक.
२१. कीटनाशकीय निरीक्षकांच्या शक्ती.
२२. कीटनाशकीय निरीक्षकांनी अनुसरावयाची कार्यपद्धती.
२३. कोणत्या ठिकाणी कीटनाशकांची निर्मिती करण्यात येते किंवा ती ठेवण्यात येतात ते उघड करणे व्यक्तींना बंधनकारक राहील.
२४. कीटनाशकीय विश्लेषकाचा अहवाल.
२५. सरकारजमा करणे.
२६. विषबाधेबाबत अधिसूचना.
२७. कीटनाशकांची विक्री, इत्यादींना सार्वजनिक सुरक्षिततेच्या कारणास्तव मनाई करणे.
२८. नोंदणी रद्द करणे, इत्यादींबाबत अधिसूचना.
२९. गुन्हे व शिक्षा.
३०. या अधिनियमाखालील खटल्यांमध्ये कोणते बचाव देता येतील किंवा देता येणार नाहीत.
३१. गुन्ह्यांची दखल घेणे व संपरीक्षा.
३२. वाढीव शिक्षा लादण्याची दंडाधिकाऱ्याची शक्ती.
३३. कंपन्यांनी केलेले गुन्हे.
३४. निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती.
३५. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.
३६. नियम करण्याची केंद्र शासनाची शक्ती.
३७. नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.
३८. सूट.

अनुसूची.

# कीटनाशके अधिनियम, १९६८

## (१९६८ चा अधिनियम क्रमांक ४६)

[२ सप्टेंबर, १९६८]

**माणसांना किंवा प्राण्यांना असलेला धोका टाळण्याच्या दृष्टीने कीटनाशकांची आयात, निर्मिती, विक्री, वाहतूक, वितरण व वापर यांचे विनियमन करण्यासाठी व त्याच्याशी निगडित असलेल्या बाबींकरता अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या एकोणिसाव्या वर्षी संसदेद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमाला 'कीटनाशके अधिनियम, १९६८' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल, आणि वेगवेगळ्या राज्यांसाठी व या अधिनियमाच्या वेगवेगळ्या उपबंधांसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

२. या अधिनियमाचे उपबंध त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या व्यतिरिक्त असतील, त्यास ते न्यूनकारी असणार नाहीत. अन्य कायदे लागू होण्यास बाधकाठी नाही.

३. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "प्राणी" याचा अर्थ, माणसांना उपयोगी प्राणी असा आहे, आणि त्यात मासे व कुक्कुटादी पक्षी, तसेच शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे केंद्र शासन ज्या जातींचे संरक्षण किंवा जतन करणे आपल्या मते इष्ट म्हणून विनिर्दिष्ट करील अशा जातींचे वन्य जीव यांचा समावेश आहे ;

(ख) "मंडळ" याचा अर्थ, कलम ४ खाली घटित केलेले 'केंद्रीय कीटनाशकीय मंडळ' असा आहे ;

(ग) "केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळा" याचा अर्थ, कलम १६ खाली स्थापन केलेली 'केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळा' किंवा, प्रकरणपरत्वे, त्याखाली विनिर्दिष्ट केलेली संस्था असा आहे ;

(घ) "आयात" याचा अर्थ, ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्यांतील कोणत्याही ठिकाणी त्या राज्यक्षेत्रांबाहेरील एखाद्या ठिकाणाहून आणणे असा आहे ;

(ङ) "कीटनाशक" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेला कोणताही पदार्थ ; किंवा

(दोन) मंडळाचा विचार घेतल्यानंतर केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी त्या अनुसूचीत समाविष्ट करील असे अन्य पदार्थ (बुरशीनाशके व तणनाशके धरून) ; किंवा

(तीन) अशा पदार्थांपैकी कोणताही एक किंवा अनेक पदार्थ अंतर्भूत असलेला कोणताही सिद्धपदार्थ ;

(च) "कीटनाशकीय विश्लेषक" याचा अर्थ, कलम १९ खाली नियुक्त झालेला कीटनाशकीय विश्लेषक असा आहे ;

(छ) "कीटनाशकीय निरीक्षक" याचा अर्थ, कलम २० खाली नियुक्त झालेला कीटनाशकीय निरीक्षक असा आहे ;

(ज) "लेबल" याचा अर्थ, लगतच्या आवेष्टनावरील आणि ते आवेष्टन ज्यात ठेवलेले किंवा आवेष्टिलेले असेल अशा अन्य प्रत्येक आवरणावरील कोणताही लिखित, मुद्रित किंवा आलेखित मजकूर असा आहे आणि त्यात कीटनाशकासोबत असलेल्या कोणत्याही लिखित, मुद्रित किंवा आलेखित मजकुराचा समावेश आहे ;

(झ) "लायसन अधिकारी" याचा अर्थ, कलम १२ खाली नियुक्त झालेला लायसन अधिकारी असा आहे ;

(ञ) कोणत्याही कीटनाशकाच्या संबंधात, "निर्मिति" या शब्दप्रयोगात—

(एक) कोणतेही कीटनाशक त्याची विक्री, वितरण किंवा वापर करण्याच्या दृष्टीने बनवण्याची, त्यात बदल करण्याची, ते परिष्कृत करण्याची, आवेष्टित करण्याची, त्यावर लेबल लावण्याची, त्याची विभागणी करण्याची किंवा त्यावर अन्य संस्करण करण्याची किंवा त्याचा अंगीकार करण्याची कोणतीही प्रक्रिया किंवा त्या प्रक्रियेचा भाग समाविष्ट आहे, पण त्यात किरकोळ विक्री धंद्याच्या ओघात केल्या जाणाऱ्या आवेष्टनाचा किंवा विभागणीचा समावेश नाही ; आणि

(दोन) कीटनाशक अंतर्भूत असलेला सिद्धपदार्थ ज्यायोगे घटकपाठानुसार तयार केला जातो अशा कोणत्याही प्रक्रियेचा समावेश आहे;

(ट्) "गैर छापाचे"—

(एक) एखाद्या महत्त्वाच्या तपशिलाबाबत खोटे किंवा दिशाभूल करणारे असे, कीट-नाशकासंबंधीचे कोणतेही विधान, आकृती किंवा आलेखित प्रतिरूपण त्याच्या लेबलावर असेल किंवा त्याचे आवेष्टन आतील वस्तूबाबत अन्य प्रकारे फसवणूक करणारे असेल तर; अथवा

(दोन) ते कीटनाशक म्हणजे दुसऱ्याची नक्कल असेल किंवा दुसऱ्या कीटनाशकाच्या नावाखाली विकले जात असेल तर ; अथवा

(तीन) जी ताकीद किंवा सावधान-सूचना माणसांना किंवा प्राण्यांना असलेला धोका टाळण्यासाठी जरूर असेल किंवा तिचे पालन केल्यास तो धोका टाळण्यास पुरेशी असेल ती त्या लेबलावर नसेल तर ; अथवा

(चार) जेव्हा कोणताही शब्द, विधान किंवा अन्य माहिती लेबलावर देणे या अधि-नियमाद्वारे किंवा त्याखाली आवश्यक केलेले असून, ते लेबलावरील इतर शब्द, विधाने, आकृत्या किंवा आलेखित मजकूर यांच्याइतक्या ठळक रीतीने आणि ज्यायोगे खरेदीच्या व वापराच्या रूढ वहिवाटीत कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीला ते वाचून समजू शकेल अशा तऱ्हेने दिलेले नसेल तर ; अथवा

(पाच) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली आवश्यक केल्याप्रमाणे ते आवेष्टिलेले नसेल किंवा त्यावर लेबल लावलेले नसेल तर ; अथवा

(सहा) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली आवश्यक केलेल्या पद्धतीने ते नोंदलेले नसेल तर ; अथवा

(सात) लेबलावर नोंदणीबाबत नोंदणी-क्रमांकाहून अन्य प्रकारचा कोणताही निर्देश असेल तर ; अथवा

(आठ) त्या कीटनाशकात विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक विषार असेल अथवा त्याच्या स्वरूपात किंवा गुणधर्मात बदल होईल अशा रीतीने कोणत्याही पदार्थाबरोबर ते मिसळलेले असेल किंवा त्याबरोबर आवेष्टिलेले असेल अथवा नोंदणीत ज्याचा अंतर्भाव नाही असा कोणताही पदार्थ त्यात अंतर्भूत असेल तर,

ते कीटनाशक गैर छापाचे आहे असे मानले जाईल.

(ठ्) "आवेष्टन" याचा अर्थ, ज्यामध्ये कीटनाशक ठेवलेले असेल किंवा आवेष्टिलेले असेल अशी पेटी, बाटली, करंडक, डबा, पिंप, खोका, पात्र, गोणी, पिशवी, वेष्टन किंवा अशी अन्य वस्तू असा आहे ;

(ड्) "जागा" याचा अर्थ, ज्या ठिकाणी कोणतेही कीटनाशक विकले जाईल किंवा त्याची निर्मिती करण्यात येईल किंवा त्याचा साठा केला जाईल किंवा त्याचा वापर केला जाईल अशी कोणतीही जमीन, दुकान, ठेला किंवा ठिकाण असा आहे व त्यामध्ये कीटनाशकाची ने-आण करणाऱ्या कोणत्याही वाहनाचा समावेश आहे ;

(ढ्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेला असा आहे ;

(ण्) "नोंदलेला" याचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसह त्याचा अर्थ, या अधिनियमाखाली नोंदलेला असा आहे ;

(त्) "विक्री" याचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसह त्याचा अर्थ, कोणत्याही कीटनाशकाची विक्री असा आहे—मग ती रोख असो वा उधारीवर असो, तसेच घाऊक असो वा किरकोळ असो ; आणि त्यामध्ये, विक्रीचा करार करणे, विक्रीचा प्रस्ताव करणे, विक्रीसाठी मांडणे किंवा विक्रीसाठी जवळ बाळगणे यांचा समावेश आहे, तसेच अशा कोणत्याही कीटनाशकाची विक्री करण्याचा प्रयत्न करणेही समाविष्ट आहे ;

(थ्) "राज्य शासन" याचा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील अर्थ त्या क्षेत्राचा प्रशासक असा आहे ;

(द्) "कामगार" याचा अर्थ, सेवेच्या किंवा शिकाऊ उमेदवारीच्या करारान्वये नियुक्त केलेली व्यक्ती असा आहे.

केंद्रीय कीटनाशकीय मंडळ.

४. (१) केंद्र शासन, होईल तितक्या लवकर, 'केंद्रीय कीटनाशकीय मंडळ' या नावाचे एक मंडळ, या अधिनियमाच्या प्रशासनातून उद्भवणाऱ्या तांत्रिक बाबींवर केंद्र शासनाला व राज्य शासनाला सल्ला देण्यासाठी आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली मंडळाला नेमून दिलेली अन्य कार्ये पार पाडण्यासाठी घटित करील.

(२) पोटकलम (१) खाली ज्या बाबींवर मंडळ सल्ला देऊ शकेल त्यांमध्ये पुढील गोष्टींसंबंधीच्या बाबींचा समावेश करील :—

(क्) कीटनाशकांच्या वापराने माणसांना किंवा प्राण्यांना पोहचणारा धोका व असा धोका टाळण्यासाठी आवश्यक ते सुरक्षिततेचे उपाय;

(ख) माणसांच्या किंवा प्राण्यांच्या सुरक्षिततेची शाश्वती मिळण्याच्या दृष्टीने कीटनाशकांची निर्मिती, विक्री, साठवण, वाहतूक व वितरण.

(३) मंडळ पुढील सदस्यांचे मिळून बनेल, ते असे :—

(एक) महा संचालक, आरोग्य सेवा—पदसिद्ध—हा अध्यक्ष असेल;
(दोन) भारताचा, औषध नियंत्रक—पदसिद्ध;
(तीन) भारत सरकारचा रोप संरक्षण सल्लागार—पदसिद्ध;
(चार) संचालक, साठवण व निरीक्षण, अन्न, कृषि, सामूहिक विकास व सहकार मंत्रालय (अन्न विभाग) —पदसिद्ध;
(पाच) मुख्य सल्लागार, कारखाने—पदसिद्ध;
(सहा) संचालक, राष्ट्रीय सांक्रामिक रोग संस्था—पदसिद्ध;
(सात) महा संचालक, भारतीय कृषि संशोधन परिषद—पदसिद्ध;
(आठ) महा संचालक, भारतीय वैद्यक संशोधन परिषद—पदसिद्ध;
(नऊ) संचालक, भारतीय प्राणिशास्त्रीय सर्वेक्षण—पदसिद्ध;
(दहा) महा संचालक, भारतीय मानक संस्था—पदसिद्ध;
(अकरा) महा संचालक, नौवहन किंवा त्याच्या अनुपस्थितीत, उप महा संचालक नौवहन, परिवहन व नौवहन मंत्रालय—पदसिद्ध;
(बारा) सह संचालक, वाहतूक (सर्वसाधारण), रेल्वे मंत्रालय (रेल्वे मंडळ)—पदसिद्ध;
(तेरा) सचिव, अन्न-मानकविषयक केंद्रीय समिती—पदसिद्ध;
[१][(तेरा क) पशुसंवर्धन आयुक्त, कृषि विभाग—पदसिद्ध;
(तेरा ख) सह आयुक्त (मत्स्यव्यवसाय), कृषि विभाग—पदसिद्ध;
(तेरा ग) वन उप महा निरीक्षक (वन्य जीव), कृषि विभाग—पदसिद्ध;
(तेरा घ) औद्योगिक सल्लागार (रसायने), तंत्र विकास महा संचालनालय—पदसिद्ध;]
(चौदा) केंद्र शासनाने नामनियुक्त करावयाची, पेट्रोलियम व रासायनिक द्रव्ये मंत्रालयाचे प्रतिनिधित्व करणारी एक व्यक्ती;
(पंधरा) केंद्र शासनाने नामनियुक्त करावयाचा एक भेषजवैज्ञानिक;
(सोळा) केंद्र शासनाने नामनियुक्त करावयाचा एक वैद्यकीय विषशास्त्रज्ञ ;
(सतरा) राज्यातील आरोग्यविषयक कामकाज पाहणाऱ्या विभागाची प्रभारी असेल अशी केंद्र शासनाने नामनियुक्त करावयाची एक व्यक्ती;
(अठरा) राज्यांतील कृषि संचालक असतील अशा केंद्र शासनाने नामनियुक्त करावयाच्या दोन व्यक्ती;
(एकोणीस) ज्यांच्यापैकी एक औद्योगिक आरोग्य व व्यवसायविषयक जोखिमा यांमधील तज्ञ असेल अशा केंद्र शासनाने नामनियुक्त करावयाच्या चार व्यक्ती;
(वीस) केंद्र शासनाने नामनियुक्त करावयाची, वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेचे प्रतिनिधित्व करणारी एक व्यक्ती;
[१][(एकवीस) केंद्र शासनाने नामनियुक्त करावयाचा एक पारिस्थितिकी तज्ञ].

(४) पोटकलम (३) चे खंड (चौदा) ते [१][(एकवीस)] (दोन्ही धरून) यांखाली नामनियुक्त केलेल्या व्यक्ती, त्यांच्या नामनियुक्तीच्या दिनांकापासून तीन वर्षपर्यंत,—तत्पूर्वी त्यांच्या जागा राजीनाम्यामुळे, मृत्यूमुळे किंवा अन्य प्रकारे रिकाम्या झाल्या नाहीत तर,—पद धारण करतील, पण त्या पुन्हा नामनियुक्त होण्यास पात्र असतील :

परंतु, खंड (सतरा) व (अठरा) खाली नामनियुक्त केलेल्या व्यक्ती, ज्या नेमणुकांच्या आधारे त्यांची नामनियुक्ती झाली त्या नेमणुका चालू असतील तोवर पद धारण करतील.

[२][(५) मंडळ, नोंदणी समिती किंवा कलम ६ खाली नियुक्त केलेली कोणतीही समिती यांची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, ते मंडळ, नोंदणी समिती किंवा, प्रकरणपरत्वे, अशी समिती यामध्ये कोणतीही जागा रिकामी होती किंवा त्यांच्या घटनेमध्ये कोणतीही उणीव होती एवढ्याच केवळ कारणावरून प्रश्नास्पद केली जाणार नाही.]

५. (१) (एक) कीटनाशकांच्या घटकपाठाची छाननी करून आणि त्यांची गुणकारिता व माणसांच्या आणि प्राण्यांच्या दृष्टीने त्यांचा निर्धोकपणा याबाबतीत आयातदाराने किंवा, प्रकरणपरत्वे, निर्माणकाने केलेल्या दाव्यांचा पडताळा घेऊन कीटनाशकांची नोंदणी करण्यासाठी; आणि नोंदणी समिती.

(दोन) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली आपणाकडे नेमून देण्यात येतील अशी इतर कामे करण्यासाठी,

---

१. १९७७ चा अधिनियम २४—कलम २ द्वारे घातले.

२. कित्ता—कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

एक नोंदणी समिती केंद्र शासनाकडून घटित केली जाईल आणि एक अध्यक्ष व पाचाहून अधिक नाहीत इतक्या व्यक्ती मिळून ती बनेल व त्या व्यक्ती (भारताचा औषध नियंत्रक व भारत सरकारचा रोप संरक्षण सल्लागार धरून) मंडळाच्या सदस्य असतील.

(२) अध्यक्ष हा मंडळाचा सदस्य नसेल त्याबाबतीत, त्याचा पदावधी व सेवेच्या इतर शर्ती केंद्र शासन ठरवील त्याप्रमाणे असतील.

(३) पोटकलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, नोंदणी समितीचा सदस्य, तो मंडळाचा सदस्य असेपर्यंत पद धारण करील.

(४) समितीस, तिला योग्य वाटतील तितके व योग्य वाटेल अशा प्रयोजनासाठी किंवा मुदतीसाठी तज्ज्ञ स्वीकृत करता येतील, पण अशा रीतीने स्वीकृत केलेल्या कोणत्याही तज्ज्ञास मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

(५) नोंदणी समिती, आपल्या स्वत:च्या कार्यपद्धतीचे व तिच्याकडून करण्यात येणाऱ्या कामकाजाच्या चालनाचे विनियमन करील.

इतर समित्या.

६. मंडळास योग्य वाटतील तितक्या समित्या त्याला नियुक्त करता येतील, तसेच, मंडळाच्या सदस्य नसलेल्या व्यक्तींकडे सोपवल्या जातील अशा शक्ती मंडळाने कोणत्याही शर्ती लादल्यास त्यांच्या अधीनतेने वापरण्यासाठी व तशी कामे तशा शर्तींच्या अधीनतेने करण्यासाठी मंडळाला त्या समित्यांवर त्या व्यक्तींची नियुक्ती करता येईल.

मंडळाची कार्यपद्धती.

७. मंडळास, आपल्या स्वत:च्या कार्यपद्धतीचे व आपल्या कोणत्याही समितीच्या कार्यपद्धतीचे तसेच, उक्त मंडळ किंवा अशी समिती यांच्याकडून करण्यात येणाऱ्या सर्व कामकाजाच्या चालनाचे विनियमन करण्यासाठी केंद्र शासनाची पूर्वमान्यता घेऊन उपविधी करता येतील.

सचिव व इतर अधिकारी.

८. केंद्र शासन,—

(एक) मंडळाचा सचिव म्हणून एखाद्या व्यक्तीची नियुक्ती करील व ती व्यक्ती नोंदणी समितीचा सचिव म्हणून देखील काम करील; व

(दोन) आपणांस आवश्यक वाटेल असा तंत्रकुशल व अन्य कर्मचारीवर्ग मंडळास आणि नोंदणी समितीस उपलब्ध करून देईल.

कीटनाशकांची नोंदणी.

९. (१) कोणत्याही कीटनाशकाची आयात किंवा निर्मिती करू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अशा कीटनाशकाच्या नोंदणीसाठी नोंदणी समितीकडे अर्ज करता येईल आणि अशा प्रत्येक कीटनाशकासाठी वेगवेगळा अर्ज द्यावा लागेल :

परंतु, या कलमाच्या प्रारंभकाळाच्या निकटपूर्वी कोणत्याही कीटनाशकांच्या आयातीच्या किंवा निर्मितीच्या धंद्यात गुंतलेल्या कोणत्याही व्यक्तीला, जे कोणतेही कीटनाशक ती अशा प्रारंभकाळाच्या निकटपूर्वी आयात करीत असेल किंवा निर्माण करीत असेल अशा कोणत्याही कीटनाशकाच्या नोंदणीसाठी, त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीमध्ये नोंदणी समितीकडे अर्ज करावा लागेल.

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यानुसार असेल व विहित करण्यात येईल असा तपशील त्यामध्ये अंतर्भूत असेल.

(३) कीटनाशकाच्या नोंदणीसाठी केलेला असा कोणताही अर्ज मिळाल्यावर, आपणास योग्य वाटेल अशी चौकशी करून ज्याच्याशी तो अर्ज संबंधित आहे ते कीटनाशक, त्याची गुणकारिता आणि माणसांच्या व प्राण्यांच्या दृष्टीने त्याचा निर्धोकपणा यांबाबत आयातदाराने किंवा, प्रकरणपरत्वे, निर्माणकाने केलेल्या दाव्यांशी मिळतेजुळते आहे याबद्दल स्वत:ची खात्री करून घेतल्यानंतर ती समिती, [१][ती विहित करील, अशा शर्तींवर व विहित करण्यात येईल अशी फी देण्यात आल्यावर] त्या कीटनाशकाची नोंदणी करू शकेल, त्यास नोंदणी-क्रमांक नेमून देऊ शकेल आणि त्याचे प्रमाण म्हणून, अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत नोंदणी-प्रमाणपत्र देऊ शकेल :

परंतु, जर समितीला तिच्यापुढे सादर केलेल्या सामग्रीच्या आधारे उक्त मुदतीत निर्णय घेणे शक्य झाले नाही तर, ती समिती सहा महिन्यांपेक्षा अधिक नाही इतक्या अवधीने मुदत आणखी वाढवू शकेल :

परंतु आणखी असे की, माणसांच्या किंवा प्राण्यांच्या सुरक्षिततेची शाश्वती मिळण्यासाठी जितकी खबरदारी पुरेशी आहे असा अर्जदाराचा दावा असेल तितकी खबरदारी सहजासहजी घेता येण्यासारखी नाही किंवा अशी खबरदारी घेतली तरी त्या कीटनाशकाच्या वापराच्या परिणामी, माणसांना किंवा प्राण्यांना गंभीर धोका पोचेल असे समितीचे मत असल्यास ती त्या कीटनाशकाची नोंदणी करण्यास नकार देऊ शकेल.

---

१. १९७७ चा अधिनियम २४–कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

[1][(३क) ३१ मार्च, १९७५ या दिवसापूर्वी स्वतःकडे आलेल्या अर्जांच्या बाबतीत, असे अर्ज निकालात काढण्यासाठी पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपलेला असला तरीही, अशा समाप्तीनंतर पण 'कीटनाशके (विशोधन) अधिनियम, १९७७' याच्या प्रारंभापासून एक वर्षाच्या कालावधीत कोणत्याही वेळी नोंदणी समितीने असे अर्ज निकालात काढणे कायदेशीर ठरेल व ते तसे नेहमीच कायदेशीर होते असे मानले जाईल :

परंतु, 'कीटनाशके (विशोधन) अधिनियम, १९७७' याच्या प्रारंभकाळापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या कोणत्याही नोंदणी प्रमाणपत्राच्या कोणत्याही शर्तीचे अशा प्रारंभकाळापूर्वी केलेले कोणतेही व्यतिक्रमण हे या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे या अधिनियमाखाली शिक्षापात्र असा गुन्हा ठरते असे मानले जाणार नाही.

(३ख) ते कीटनाशक भारतात प्रथमच वापरात आणले जात आहे असे नोंदणी समितीचे मत असेल त्या बाबतीत, कोणतीही चौकशी होईपर्यंत त्या समितीला, ती स्वतः विनिर्दिष्ट करील अशा शर्तींवर त्या कीटनाशकाची दोन वर्षांच्या कालावधीकरता तात्पुरती नोंदणी करता येईल.

(३ग) त्या कीटनाशकाची गुणकारिता आणि माणसांच्या व प्राण्यांच्या दृष्टीने त्याचा निर्धोकपणा विचारात घेऊन, नोंदणी समिती नोंदणी प्रमाणपत्र ज्या शर्तींवर देण्यात आले होते त्या शर्ती बदलू शकेल आणि त्यासाठी लेखी नोटीस काढून त्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत ते प्रमाणपत्र परत स्वाधीन करण्यास प्रमाणपत्रधारकाला सांगू शकेल.]

(४) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीच्या अर्जावरून एखाद्या कीटनाशकाची नोंदणी करण्यात आली असेल त्याबाबतीत, कीटनाशकाची आयात किंवा निर्मिती करू इच्छिणाऱ्या अथवा आयातीच्या किंवा निर्मितीच्या धंद्यात गुंतलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने अर्ज केल्यावर व विहित फी दिल्यावर, कीटनाशकाची मुळात ज्या शर्तींवर नोंदणी करण्यात आली त्याच शर्तींवर नोंदणी-क्रमांक नेमून देण्यात येईल व नोंदणी-प्रमाणपत्र दिले जाईल.

**नोंदणी न करण्याविरुद्ध किंवा ती रद्द करण्याविरुद्ध अपील.**

१०. कलम ९ खालील नोंदणी समितीच्या निर्णयाने नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, तो निर्णय तिला कळविण्यात आला त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या मुदतीत, विहित रीतीने व विहित फी दिल्यानंतर, केंद्र शासनाकडे अपील करता येईल व त्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल :

परंतु, पुरेशा कारणामुळे अपीलकर्ता अपील मुदतीत दाखल करू शकला नाही अशी केंद्र शासनाची खात्री झाली तर, केंद्र शासनाला उक्त मुदत संपल्यावरही अपील विचारार्थ स्वीकारता येईल.

**केंद्र शासनाची पुनरीक्षणाची शक्ती.**

११. ज्या प्रकरणामध्ये नोंदणी समितीने कलम ९ खाली निर्णय दिला असेल अशा कोणत्याही प्रकरणासंबंधीचा अभिलेख केंद्र शासनाला अशा कोणत्याही निर्णयाची वैधता किंवा औचित्य यासंबंधी स्वतःची खात्री करून घेण्यासाठी कोणत्याही वेळी मागवता येईल आणि त्यासंबंधात त्यास योग्य वाटेल असा कोणताही आदेश देता येईल :

परंतु, निर्णयाच्या दिनांकापासून एक वर्षानंतर असा कोणताही आदेश दिला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीस नियोजित आदेशाविरुद्ध कारण दाखविण्याची वाजवी संधी मिळाल्याशिवाय, केंद्र शासन त्या व्यक्तीस बाधक असा कोणताही आदेश देणार नाही.

**लायसन अधिकारी.**

१२. राज्य शासनास, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ त्यास योग्य वाटतील अशा व्यक्तींची, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, लायसन अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल व कोणत्या क्षेत्रांच्या बाबतीत त्यांनी आपल्या अधिकारितेचा वापर करावा ते निश्चित करता येईल.

**लायसने देणे.**

१३. (१) कोणत्याही कीटनाशकाची निर्मिती करण्याची अथवा त्याची विक्री करण्याची अथवा ते विक्रीसाठी साठवण्याची किंवा विक्रीसाठी मांडण्याची अथवा त्याचे वितरण करण्याची [2][अथवा कोणत्याही कीटनाशकाचा उपयोग करून व्यापारी तत्त्वावर कीटनियंत्रणाची कामे पत्करण्याची] इच्छा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, लायसन मिळण्यासाठी लायसन अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल :

परंतु, या कलमाच्या प्रारंभकाळाच्या निकटपूर्वी कोणत्याही कीटनाशकाच्या निर्मितीच्या किंवा विक्रीच्या अथवा ते विक्रीसाठी साठवण्याच्या किंवा विक्रीसाठी मांडण्याच्या किंवा त्याच्या वितरणाच्या धंद्यात गुंतलेल्या कोणत्याही व्यक्तीला अशा प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या मुदतीमध्ये लायसन मिळण्यासाठी लायसन अधिकाऱ्याकडे अर्ज करावा लागेल :

[2][परंतु आणखी असे की, 'कीटनाशके (विशोधन) अधिनियम, १९७७' याच्या प्रारंभकाळापूर्वी व्यापारी तत्त्वावर कीटनियंत्रण करण्याच्या कामांमध्ये गुंतलेल्या कोणत्याही व्यक्तीला लायसन मंजूर होण्यासाठी उक्त अधिनियमाच्या प्रारंभापासून सहा महिन्यांच्या कालावधीत लायसन अधिकाऱ्याकडे अर्ज करावा लागेल.]

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यानुसार असेल व विहित करण्यात येईल असा तपशील त्यामध्ये अंतर्भूत असेल.

---

१. १९७७ चा अधिनियम २४–कलम ३ द्वारे घातले.
२. कित्ता-कलम ४ द्वारे घातले.

(३) लायसन मिळण्यासाठी करण्यात आलेला असा कोणताही अर्ज मिळाल्यावर, लायसन अधिकारी विहित करण्यात येईल अशा नमुन्यानुसार, अशा शर्तींवर व अशी फी देण्यात आल्यावर लायसन देऊ शकेल.

(४) या कलमाखाली देण्यात आलेले लायसन त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीपुरते विधिग्राह्य असेल आणि विहित करण्यात येईल अशा मुदतीसाठी व अशी फी दिल्यावर वेळोवेळी त्याचे नूतनीकरण करता येईल :

परंतु, पोटकलम (१) च्या [1][ पहिल्या परंतुकाखाली किंवा, प्रकरणपरत्वे, दुसऱ्या ] परंतुकाखाली जिने अर्ज केला आहे अशा कोणत्याही व्यक्तीला लायसन देण्यात आले असल्यास त्या बाबतीत ज्याच्या नोंदणीसाठी दिलेला अर्ज नाकारण्यात आला किंवा ज्याची नोंदणी रद्द करण्यात आली अशा कोणत्याही कीटनाशकाच्या संबंधात, अर्ज नाकारण्यात आल्याचे किंवा नोंदणी रद्द करण्यात आल्याचे अधिसूचित करण्यात आले असेल त्या दिनांकी व तेव्हापासून लायसन रद्द करण्यात आल्याचे मानले जाईल.

[1][(५) या कलमाखाली लायसनांच्या मंजुरीसाठी किंवा नूतनीकरणासाठी फी विहित करताना, घरगुती वापराच्या प्रयोजनार्थ व इतर प्रयोजनार्थ कीटनाशकांची विक्री किंवा वितरण करण्याबद्दल वेगवेगळी फी विहित करता येईल. ]

**लायसनांचे प्रत्याहरण, निलंबन व विशोधन.**

१४. (१)(क) कलम १३ खाली देण्यात आलेले लायसन सारभूत तथ्याबाबत अपवेदन केले गेल्यामुळे देण्यात आले आहे; किंवा

(ख) ज्या शर्तींच्या अधीनतेने लायसन देण्यात आले होते त्यांचे अनुपालन करण्यात लायसनधारकाने कसूर केली आहे किंवा या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधांचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे व्यतिक्रमण केले आहे,

याबाबत लायसन अधिकाऱ्याकडे करण्यात आलेल्या निर्देशनावरून किंवा अन्यथा त्याची खात्री पटली तर, या अधिनियमाखाली लायसनधारक ज्या अन्य कोणत्याही दंडास पात्र ठरेल त्याला बाध न येता, लायसन अधिकारी, लायसनधारकास कारण दाखवण्याची संधी दिल्यानंतर, ते लायसन प्रत्याहृत किंवा निलंबित करू शकेल .

(२) या संबंधात करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, कलम १३ खाली दिलेल्या लायसनामध्ये लायसन अधिकाऱ्याला बदल किंवा विशोधनही करता येईल.

**लायसन अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध अपील.**

१५. (१) कलम १३ [पोटकलम (४) च्या परंतुकाखालील बाब खेरीजकरून] किंवा कलम १४ याखाली लायसन अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाने नाराज झालेल्या व्यक्तीस, तो निर्णय तिला कळवण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या मुदतीत, विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडे अशा रीतीने व अशी फी दिल्यावर, अपील करता येईल :

परंतु, पुरेशा कारणामुळे अपीलकर्ता मुदतीत अपील दाखल करू शकला नाही याबद्दल अपील प्राधिकरणाची खात्री झाली तर, त्याला उक्त मुदत संपल्यानंतरसुद्धा अपील विचारार्थ स्वीकारता येईल.

(२) पोटकलम (१) खालील अपील मिळाल्यावर अपील प्राधिकरण, अपीलकर्त्याला कारण दाखवण्याची संधी देऊन नंतर, सर्वसाधारणतः सहा महिन्यांच्या मुदतीत त्या अपीलाचा निकाल करील व अपील प्राधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.

**केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळा.**

१६. केंद्र शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे एक केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळा स्थापन करता येईल व ती या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली त्या प्रयोगशाळेकडे सोपवण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी केंद्र शासनाने नियुक्त करावयाच्या अशा संचालकाच्या नियंत्रणाधीन राहील :

परंतु, जर केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे तसा निदेश दिला तर, केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळेची कार्ये अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही संस्थेकडून अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या मर्यादेपर्यंत पार पाडण्यात येतील व तदनंतर केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळेच्या संचालकाचे कार्याधिकार, याप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत त्या संस्थेच्या प्रमुखाकडून वापरण्यात येतील.

**विवक्षित कीटनाशकांची आयात व निर्मिती यांना मनाई.**

१७. (१) कोणत्याही व्यक्तीला स्वतः किंवा आपल्या वतीने कोणत्याही व्यक्तीकरवी,—

(क) गैर छापाच्या कोणत्याही कीटनाशकाची ;

(ख) ज्याची विक्री, वितरण किंवा वापर करण्यास त्यावेळी कलम २७ खाली मनाई करण्यात आली असेल अशा कोणत्याही कीटनाशकाची ;

(ग) ज्या शर्तींवर कोणत्याही कीटनाशकाची नोंदणी करण्यात आली असेल त्यानुसार नव्हे तर अन्य प्रकारे त्या कीटनाशकाची ;

(घ) या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण करून कोणत्याही कीटनाशकाची,

आयात किंवा निर्मिती करता येणार नाही :

---

१. १९७७ चा अधिनियम २४-कलम ४ द्वारे घातले.

परंतु, कलम ९–पोटकलम (१) याच्या परंतुकाखाली कीटनाशकाच्या नोंदणीसाठी जिने अर्ज केला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, अशा कोणत्याही कीटनाशकाची आयात किंवा निर्मिती चालू ठेवता येईल व उक्त कीटनाशकाच्या नोंदणीस नकार देणारा आपला निर्णय नोंदणी समितीने तिला कळवलेला नाही तोपर्यंत असे कीटनाशक हे कलम ३ च्या खंड (ट्) मधील उपखंड (सहा) किंवा उपखंड (सात) किंवा उपखंड (आठ) याच्या अर्थानुसार गैर छापाचे कीटनाशक म्हणून मानले जाणार नाही.

(२) कोणत्याही कीटनाशकाच्या निर्मितीच्या प्रयोजनासाठी या अधिनियमाखाली देण्यात आलेल्या लायसनाअन्वये व त्याच्या शर्तींना अनुसरून नव्हे तर अन्यथा, कोणत्याही व्यक्तीला स्वत:ला किंवा आपल्या वतीने कोणत्याही व्यक्तीकरवी अशी निर्मिती करता येणार नाही.

**विवक्षित कीटनाशकांची विक्री इत्यादीस मनाई.**

१८. (१) (क्) या अधिनियमाखाली ज्याची नोंदणी करण्यात आलेली नाही असे कोणतेही कीटनाशक ;

(ख्) ज्याच्या विक्रीस, वितरणास किंवा वापरास त्या त्या वेळी कलम २७ खाली मनाई करण्यात आली असेल असे कोणतेही कीटनाशक ;

(ग्) या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण करून कोणतेही कीटनाशक ;

कोणत्याही व्यक्तीला स्वत:ला किंवा आपल्या वतीने इतर कोणत्याही व्यक्तीकरवी विकता येणार नाही, विक्रीसाठी साठवता येणार नाही किंवा विक्रीसाठी मांडता येणार नाही, वितरित करता येणार नाही, [1][त्याची वाहतूक करता येणार नाही, वापर करता येणार नाही किंवा कोणत्याही कामगाराकरवी त्याचा वापर करवता येणार नाही.]

(२) कोणत्याही कीटनाशकाची विक्री करण्याच्या, ते विक्रीसाठी साठवण्याच्या किंवा विक्रीसाठी मांडण्याच्या किंवा वितरित करण्याच्या [2][किंवा व्यापारी तत्त्वावर कीट नियंत्रण करण्याच्या कामी वापरण्याच्या] प्रयोजनासाठी या अधिनियमाखाली देण्यात आलेल्या लायसनाअन्वये व त्याच्या शर्तींना अनुसरून नव्हे तर अन्यथा, कोणत्याही व्यक्तीला स्वत:ला किंवा आपल्या वतीने कोणत्याही व्यक्तीकरवी तसे करता येणार नाही.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, ज्या कीटनाशकाबाबत कोणत्याही व्यक्तीने कलम ९–पोटकलम (१) याच्या परंतुकाखाली नोंदणी–प्रमाणपत्रासाठी अर्ज केला असेल त्याच्या नोंदणीस नकार देण्यात आल्याचे ज्या दिनांकास शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल त्या दिनांकापर्यंत असे कीटनाशक नोंदलेले म्हणून मानण्यात येईल.

**कीटनाशकीय विश्लेषक.**

१९. शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रांसाठी व अशा कीटनाशकांच्या किंवा कीटनाशक-वर्गांच्याबाबत, विहित करण्यात येतील अशा तांत्रिक व इतर अर्हता असणाऱ्या व स्वत:स योग्य वाटतील इतक्या व्यक्ती 'कीटनाशकीय विश्लेषक' म्हणून नियुक्त करता येतील :

परंतु, कोणत्याही कीटनाशकाच्या निर्मितीत, आयातीत किंवा विक्रीत जिचा कोणताही आर्थिक हितसंबंध असेल अशा कोणत्याही व्यक्तीची याप्रमाणे नियुक्ती करण्यात येणार नाही.

**कीटनाशकीय निरीक्षक.**

२०. (१) शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे केंद्र शासनास किंवा राज्य शासनास, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रांसाठी, विहित करण्यात येईल अशा तांत्रिक व इतर अर्हता असणाऱ्या व स्वत:स योग्य वाटतील इतक्या व्यक्ती 'कीटनाशकीय निरीक्षक' म्हणून नियुक्त करता येतील :

परंतु, आवश्यक ती अर्हता नसणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची केवळ कलम २१–पोटकलम (१) याच्या खंड (क्) व खंड (घ्) यांच्याच प्रयोजनार्थ याप्रमाणे नियुक्ती करता येईल :

परंतु आणखी असे की, कोणत्याही कीटनाशकाच्या निर्मितीत, आयातीत किंवा विक्रीत जिचा कोणताही आर्थिक हितसंबंध असेल अशा कोणत्याही व्यक्तीची याप्रमाणे नियुक्ती करण्यात येणार नाही.

(२) प्रत्येक कीटनाशकीय निरीक्षक हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)–कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानले जाईल व त्याची नियुक्ती करणारे शासन यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणाला तो पदपरत्वे दुय्यम असेल.

**कीटनाशकीय निरीक्षकाच्या शक्ती.**

२१. (१) कीटनाशकीय निरीक्षकास पुढील गोष्टी करण्याची शक्ती असेल :—

(क्) ज्या जागेत या अधिनियमाखालील किंवा त्या अन्वये केलेल्या नियमांखालील गुन्हा घडला आहे किंवा घडत आहे अथवा घडण्याच्या बेतात आहे असे समजण्यास त्याला कारण असेल अशा कोणत्याही जागेत अथवा या अधिनियमाच्या उपबंधांचे किंवा त्यांखाली करण्यात

---

१. १९७७ चा अधिनियम २४—कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

२. कित्ता—कलम ५ द्वारे घातले.

आलेल्या नियमांचे किंवा त्यांअन्वये दिलेल्या नोंदणी-प्रमाणपत्राच्या किंवा लायसनाच्या शर्तीचे अनुपालन करण्यात येत आहे याबद्दल आपली खात्री करून घेण्यासाठी, कोणत्याही वाजवी वेळी व जरूर तर आपणास आवश्यक वाटेल अशा कोणत्याही साहाय्यानिशी प्रवेश करून त्या जागेची झडती घेणे ;

(ख) या अधिनियमाच्या उपबंधांनुसार किंवा त्यांखाली केलेल्या नियमांनुसार, निर्माणकाने, वितरकाने, परिवाहकाने, व्यापाऱ्याने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने ठेवलेल्या नोंदवह्या, अभिलेख किंवा इतर कागदपत्रे हजर करण्यास भाग पाडणे व त्यांचे निरीक्षण करणे, तपासणी करणे आणि त्यांच्या नकला करणे किंवा त्यांतील उतारे घेणे आणि या अधिनियमाखाली किंवा त्याअन्वये केलेल्या नियमांखाली शिक्षापात्र असलेला गुन्हा घडल्याचा पुरावा त्या सर्व कागदपत्रांवरून किंवा त्यांपैकी कशाहीवरून मिळू शकेल असे समजण्यास त्याला कारण असेल तर ते सर्व सक्तीने ताब्यात घेणे ;

(ग) या अधिनियमाच्या उपबंधांचे किंवा त्यांखाली केलेल्या नियमांचे अनुपालन करण्यात आले आहे किंवा कसे याची खात्री करून घेण्यासाठी, त्यास योग्य वाटेल अशी तपासणी व चौकशी करणे आणि त्या प्रयोजनासाठी कोणतेही वाहन थांबवणे ;

(घ) या अधिनियमाच्या उपबंधांचे किंवा त्यांखाली केलेल्या नियमांचे व्यतिक्रमण करून ज्या कीटनाशकाचे वितरण, विक्री किंवा वापर करण्यात येत आहे असे समजण्यास त्याला कारण असेल त्याचे वितरण, विक्री किंवा वापर वीस दिवसांपेक्षा अधिक नाही इतक्या विनिर्दिष्ट मुदतीपुरता थांबवणे किंवा कीटनाशकाच्या कब्जेदाराला अभिकथित व्यतिक्रमणाचा दोष काढून टाकता येईल असे त्या व्यतिक्रमणाचे स्वरूप नसेल तर अशा कीटनाशकाचा साठा सक्तीने ताब्यात घेणे ;

(ङ) कोणत्याही कीटनाशकाचे नमुने घेऊन ते विहित रीतीने परीक्षा करण्यासाठी कीटनाशकीय विश्लेषकाकडे विश्लेषणाकरिता पाठविणे ; व

(च) या अधिनियमाची किंवा त्याखाली केलेल्या नियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर शक्तींचा वापर करणे.

[1][(२) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) चे उपबंध जसे उक्त संहितेच्या कलम ९४ खाली काढलेल्या वॉरंटाच्या प्राधिकारान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही झडतीस किंवा अभिग्रहणास लागू आहेत तसेच ते या अधिनियमाखालील कोणत्याही झडतीस किंवा अभिग्रहणास, होईल तेथवर, लागू असतील.]

(३) जिच्याकडून नमुना घेण्यात आला किंवा कीटनाशक सक्तीने ताब्यात घेण्यात आले अशा व्यक्तीच्या खऱ्या नावाबद्दल व तिच्या राहण्याच्या ठिकाणाबद्दल खात्री करून घेण्यासाठी कीटनाशकीय निरीक्षकास [1]['फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) च्या कलम ४२ खाली] पोलीस अधिकाऱ्याला असलेल्या शक्तींचा वापर करता येईल.

कीटनाशकीय निरीक्षकांनी अनुसरावयाची कार्यपद्धती.

२२. (१) कलम २१–पोटकलम (१) याच्या खंड (ख) खाली कीटनाशकीय निरीक्षक कोणताही अभिलेख, नोंदवही अथवा कागदपत्र सक्तीने ताब्यात घेईल तेव्हा, तो होईल तितक्या लवकर, ते दंडाधिकाऱ्यास कळवील व त्याच्या अभिरक्षेसंबंधी त्याचे आदेश घेईल.

(२) कलम २१–पोटकलम (१) याच्या खंड (घ) खाली कीटनाशकीय निरीक्षक कोणतीही कारवाई करील तेव्हा—

(क) कीटनाशकामुळे अथवा त्याच्या विक्रीमुळे, वितरणामुळे किंवा वापरामुळे कलम १८ च्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण होत आहे किंवा कसे यासंबंधी खात्री करून घेण्यासाठी तो शक्य तितकी तत्परता दाखवील व कीटनाशकामुळे अथवा त्याच्या विक्रीमुळे किंवा त्याच्या वितरणामुळे किंवा वापरामुळे असे व्यतिक्रमण होत नाही याबद्दल आपली खात्री झाली तर, तो उक्त खंडाखाली दिलेला आदेश तत्काळ रद्द करील किंवा, प्रकरणपरत्वे, ताब्यात घेतलेला साठा परत करण्यासाठी आवश्यक असेल अशी कारवाई करील ;

(ख) जर त्याने कीटनाशकाचा साठा सक्तीने ताब्यात घेतला तर, तो होईल तितक्या लवकर दंडाधिकाऱ्यास ते कळवील व त्या कीटनाशकाच्या अभिरक्षेबाबत त्याचे आदेश घेईल ;

(ग) कीटनाशकाच्या कब्जेदाराला अभिकथित व्यतिक्रमणाचा दोष दुरुस्त करता येण्यासारखा आहे असे त्याचे स्वरूप असेल तर, त्या व्यतिक्रमणाबद्दल जो कोणताही खटला भरता येण्यासारखा असेल त्यास बाध न येता, कीटनाशकीय निरीक्षक, तो दोष याप्रमाणे दुरुस्त करण्यात आला असल्याची खात्री झाल्यावर तात्काळ तो आदेश रद्द करील आणि त्याने कीटनाशकाचा साठा ताब्यात घेतला असल्यास त्या बाबतीत, तो होईल तितक्या लवकर दंडाधिकाऱ्याला ते कळवील आणि तो साठा मुक्त करण्याबाबत त्याचे आदेश घेईल.

(३) कीटनाशकीय निरीक्षकाने कीटनाशकाचा कोणताही नमुना घेतल्यास त्या बाबतीत तो, त्याची रास्त किंमत देऊ करील व त्याबद्दल त्यास लेखी पोचपावतीची मागणी करता येईल.

---

१. १९७७ चा अधिनियम २४—कलम ६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(४) पोटकलम (३) खाली देऊ केलेली किंमत नाकारण्यात आल्यास किंवा कीटनाशकीय निरीक्षकाने कलम २१–पोटकलम (१) याच्या खंड (घ) खाली कोणत्याही कीटनाशकाचा साठा सक्तीने ताब्यात घेतला असेल तर, तो त्याबद्दल विहित नमुन्यानुसार पावती देईल.

(५) कीटनाशकीय निरीक्षकाने परीक्षा किंवा विश्लेषण करण्यासाठी कीटनाशकाचा नमुना घेतला असेल तर, जिच्याकडून त्याने तो नमुना घेतला त्या व्यक्तीस असे प्रयोजन तो विहित नमुन्यानुसार लेखी कळवील व अशी व्यक्ती बुद्धिपुरस्सर अनुपस्थित राहिली असे झाले नाही तर, तो तिच्या समक्ष नमुन्याची तीन भागांमध्ये विभागणी करील व ते पक्के मोहोरबंद करून त्यावर योग्य प्रकारे चिन्हांकन करील आणि अशा रीतीने मोहोरबंद व चिन्हांकित केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही भागांवर अशा व्यक्तीला तिची स्वतःची मोहोर व चिन्ह लावू देईल :

परंतु, कीटनाशक हे लहान आकाराच्या पात्रात बांधून ठेवलेले असेल तेव्हा, पूर्वोक्तानुसार नमुन्याची विभागणी करण्याऐवजी त्याला उक्त पात्रांपैकी तीन पात्रे, ती योग्य प्रकारे चिन्हांकित करून व जरूर तर, मोहोरबंद करून घेता येतील आणि कीटनाशक उघडे ठेवल्याने ते खराब होण्याचा किंवा अन्यथा त्यास हानी पोहोचण्याचा संभव आहे अशा प्रकारचे ते असेल तर, ती पात्रे त्याला त्याप्रमाणे चिन्हांकित व मोहोरबंद करावी लागतील.

(६) कीटनाशकीय निरीक्षक, अशा रीतीने विभागणी केलेल्या नमुन्याचा एक भाग किंवा, प्रकरणपरत्वे, एक पात्र ज्या व्यक्तीकडून त्याने ते घेतले असेल त्या व्यक्तीस परत देईल व शिल्लक राहिलेले भाग किंवा पात्रे ठेवून घेईल आणि त्याची पुढीलप्रमाणे विल्हेवाट करील :—

(एक) एक भाग किंवा पात्र परीक्षा किंवा विश्लेषण करण्यासाठी कीटनाशकीय विश्लेषकाकडे तत्काळ पाठवून देईल ; व

(दोन) दुसरा भाग किंवा पात्र त्या कीटनाशकाबाबत कोणतीही कार्यवाही सुरू केली असल्यास ज्या न्यायालयापुढे ती चालविण्यात येत असेल त्या न्यायालयासमोर तो हजर करील.

कोणत्या ठिकाणी कीटनाशकांची निर्मिती करण्यात येते किंवा ती ठेवण्यात येतात ते उघड करणे व्यक्तींना बंधनकारक राहील.

२३. ज्या ठिकाणी कोणत्याही कीटनाशकाची निर्मिती करण्यात येते अथवा ते विक्रीसाठी किंवा वितरणासाठी ठेवण्यात येते अशा कोणत्याही जागेचा ताबा त्या त्या वेळी जिच्याकडे असेल ती प्रत्येक व्यक्ती, कीटनाशकीय निरीक्षकाने तशी मागणी केली असता, प्रकरणपरत्वे, कोणत्या ठिकाणी कीटनाशकाची निर्मिती करण्यात येते किंवा, ते ठेवण्यात येते ते ठिकाण कीटनाशकीय निरीक्षकाकडे उघड करण्यास विधितः बांधलेली असेल.

कीटनाशकीय विश्लेषकाचा अहवाल.

२४. (१) कलम २२–पोटकलम (६) खाली कोणत्याही कीटनाशकाचा नमुना परीक्षा किंवा विश्लेषण करण्यासाठी ज्याच्याकडे सादर करण्यात आला असेल तो कीटनाशकीय विश्लेषक, ज्याने तो नमुना दिला त्या कीटनाशकीय निरीक्षकाकडे साठ दिवसांच्या मुदतीत विहित नमुन्यात दोन प्रतींत आपला स्वाक्षरित अहवाल सादर करील.

(२) तो अहवाल मिळाल्यावर कीटनाशकीय निरीक्षक त्या अहवालाची एक प्रत, ज्या व्यक्तीकडून नमुना घेण्यात आला त्या व्यक्तीस देईल व दुसरी प्रत, त्या नमुन्याबाबतच्या कोणत्याही खटल्यामध्ये उपयोगात आणण्यासाठी ठेवून घेईल.

(३) जो दस्तऐवज कीटनाशकीय विश्लेषकाचा स्वाक्षरित अहवाल असल्याचे अभिप्रेत असेल असा कोणताही दस्तऐवज त्यामध्ये नमूद केलेल्या गोष्टींचा पुरावा असेल आणि जिच्याकडून नमुना घेण्यात आला असेल त्या व्यक्तीने अहवालाची प्रत मिळाल्यापासून अठ्ठावीस दिवसांच्या आत, कीटनाशकीय निरीक्षकास किंवा ज्या न्यायालयासमोर त्या नमुन्याबाबतची कोणतीही कार्यवाही प्रलंबित असेल त्या न्यायालयास, त्या अहवालाच्या विरोधी पुरावा सादर करण्याचा आपला विचार आहे असे लेखी सूचित केले नाही तर, असा पुरावा निर्णायक असेल.

(४) पोटकलम (३) खाली एखाद्या व्यक्तीने कीटनाशकीय विश्लेषकाच्या अहवालाच्या विरोधी पुरावा सादर करण्याचा आपला विचार सूचित केला असेल त्याबाबतीत केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळेत नमुन्याची परीक्षा किंवा विश्लेषण आधीच करण्यात आलेले नसल्यास, न्यायालयास स्वतः होऊन अथवा फिर्यादीच्या किंवा आरोपीच्या विनंतीवरून स्वविवेकानुसार त्या कीटनाशकाचा नमुना उक्त प्रयोगशाळेकडे परीक्षेसाठी किंवा विश्लेषणासाठी पाठवावयाचा म्हणून कलम २२–पोटकलम (६) खाली दंडाधिकाऱ्यासमोर हजर करविता येईल व ती प्रयोगशाळा त्याची परीक्षा किंवा विश्लेषण करून, केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळेच्या संचालकाने किंवा त्याच्या प्राधिकारान्वये स्वाक्षरित केलेल्या लेखाद्वारे त्यातील निष्कर्षासंबंधीचा अहवाल देईल व असा अहवाल त्यामध्ये नमूद केलेल्या तथ्यांचा निर्णायक पुरावा असेल.

(५) पोटकलम (४) खाली केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळेने केलेल्या परीक्षेचा किंवा विश्लेषणाचा खर्च, न्यायालय निदेश देईल त्याप्रमाणे, तक्रारदाराला किंवा आरोपीला सोसावा लागेल.

सरकारजमा करणे.

२५. (१) या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचे व्यतिक्रमण केल्याबद्दल कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाखाली दोषी ठरविण्यात आले असेल, त्याबाबतीत, ज्या कीटनाशकाच्या बाबतीत व्यतिक्रमण करण्यात आले त्याचा साठा सरकारजमा होण्यास पात्र ठरेल.

(२) उक्त कीटनाशक हे गैर छापाचे कीटनाशक आहे याबद्दल कीटनाशकीय निरीक्षकाच्या अर्जावरून किंवा अन्यथा, व आवश्यक ती चौकशी केल्यानंतर न्यायालयाची तशी खात्री होईल त्याबाबतीत, पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांस बाध न येता, असे कीटनाशक सरकारजमा होण्यास पात्र ठरेल.

**विषबाधेबाबत अधिसूचना.**

२६. राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तिवर्गाने तिच्या किंवा त्याच्या निदर्शनास येणाऱ्या (कोणत्याही कीटनाशकाचा वापर करताना किंवा ते हाताळताना झालेल्या) विषबाधेच्या सर्व घटनांचे वृत्त उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्याला कळवावे असे त्या व्यक्तीस किंवा त्या व्यक्तिवर्गास फर्मावू शकेल.

**कीटनाशकांची विक्री, इत्यादींना सार्वजनिक सुरक्षिततेच्या कारणास्तव मनाई करणे.**

२७. (१) कलम ३–पोटकलम (ङ)–उपखंड (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कीटनाशकाच्या किंवा एखाद्या विशिष्ट भट्टीतील कीटनाशकांच्या वापरामुळे माणसांना किंवा प्राण्यांना असा धोका पोचण्याचा संभव आहे की, ज्यामुळे तत्काळ कारवाई करणे समयोचित किंवा आवश्यक झाले आहे असे केंद्र शासनाचे किंवा राज्य शासनाचे, कलम २६ खाली वृत्त मिळाल्यावरून किंवा अन्य कारणाने मत झाले तर, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्या शासनाला त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रात, अशा मर्यादेपर्यंत व अशा मुदतीकरिता (साठ दिवसांहून अधिक नाही इतक्या) त्या बाबीचे अन्वेषण होईतोवर, त्या कीटनाशकाच्या किंवा त्या भट्टीतील कीटनाशकांच्या विक्रीस, वितरणास किंवा वापरास मनाई करता येईल :

परंतु, उक्त मुदतीत अन्वेषणाचे काम पूर्ण झाले नाही तर, केंद्र शासनाला किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासनाला ती मुदत त्याच रीतीने ते विनिर्दिष्ट करील अशा आणखी पण एकूण तीस दिवसांपेक्षा अधिक नाही इतक्या अवधीने किंवा अवधींनी वाढविता येईल.

(२) स्वतः केलेल्या अन्वेषणाची निष्पत्ती म्हणून किंवा राज्य शासनाकडून वृत्त मिळाल्यावरून व नोंदणी समितीचा विचार घेतल्यानंतर, उक्त कीटनाशकाच्या किंवा उक्त भट्टीतील कीटनाशकांच्या वापरामुळे असा कोणताही धोका पोचण्याचा संभव आहे किंवा तसा संभव नाही अशी केंद्र शासनाची खात्री झाली तर, प्रकरणाच्या परिस्थितीनुरूप त्यास योग्य वाटेल असा आदेश (कीटनाशकाची नोंदणी करण्यास नकार देणारा किंवा त्याबाबत कोणतेही नोंदणी–प्रमाणपत्र देण्यात आलेले असल्यास ते रद्द करणारा आदेश यासुद्धा) काढता येईल.

**नोंदणी रद्द करणे, इत्यादींबाबत अधिसूचना.**

२८. कोणत्याही कीटनाशकाची नोंदणी करण्यास नकार देण्यात आल्याचे किंवा कोणत्याही कीटनाशकाचे नोंदणी-प्रमाणपत्र रद्द केल्याचे शासकीय राजपत्रात व विहित करण्यात येईल अशा अन्य रीतीने अधिसूचित करण्यात येईल.

**गुन्हे व शिक्षा.**

२९. (१) जी कोणी व्यक्ती,—

(क) कलम ३-खंड (ट) च्या उपखंड (एक) किंवा उपखंड (तीन) किंवा उपखंड (आठ) खाली गैर छापाचे मानल्या जाणाऱ्या कोणत्याही कीटनाशकाची आयात, निर्मिती किंवा विक्री करील अथवा विक्रीसाठी ते साठवील किंवा विक्रीसाठी मांडील किंवा त्याचे वितरण करील ; किंवा

(ख) नोंदणी-प्रमाणपत्राशिवाय कोणत्याही कीटनाशकाची आयात किंवा निर्मिती करील ; किंवा

(ग) लायसन नसताना कीटनाशकाची निर्मिती किंवा विक्री करील किंवा विक्रीसाठी ते साठवील किंवा विक्रीसाठी मांडील किंवा त्याचे वितरण करील ; किंवा

(घ) कलम २७ चे व्यतिक्रमण करून, कीटनाशकाची विक्री किंवा वितरण करील ; किंवा

(ङ) कलम २७ खाली ज्याच्या वापरास मनाई करण्यात आली असेल अशा कीटनाशकाचा कोणत्याही कामगाराकरवी वापर करवील ; किंवा

(च) या अधिनियमाखाली किंवा त्याअन्वये केलेल्या नियमांखाली एखादा कीटनाशकीय निरीक्षक आपल्या शक्तींचा वापर करीत असताना किंवा आपली कामे पार पाडीत असताना त्याला अटकाव करील,

ती व्यक्ती,—

(एक) पहिल्यांदा केलेल्या गुन्ह्याबद्दल, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल ;

(दोन) दुसऱ्यांदा व त्यानंतर केलेल्या गुन्ह्याबद्दल, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(२) जो कोणी या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण करून, एखाद्या कीटनाशकाचा वापर करील तो, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(३) जो कोणी या अधिनियमाच्या अन्य उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे अथवा नोंदणी-प्रमाणपत्राच्या किंवा त्याखाली दिलेल्या लायसनाच्या कोणत्याही शर्तीचे व्यतिक्रमण करील तो,—

(एक) पहिल्यांदा केलेल्या गुन्ह्याबद्दल, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल ;

(दोन) दुसऱ्यांदा व त्यानंतर केलेल्या गुन्ह्याबद्दल, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल ;

(४) या अधिनियमाखाली एखाद्या गुन्ह्याबद्दल दोषी ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीने जर त्यानंतर तशाच प्रकारचा गुन्हा केला तर, ज्या न्यायालयासमोर त्या व्यक्तीची दुसरी किंवा नंतरची दोषसिद्धी होईल त्या न्यायालयाने गुन्हेगाराचे नाव व राहण्याचे ठिकाण, गुन्हा व त्याला दिलेली शिक्षा या गोष्टी ते न्यायालय निदेशित करील अशा वर्तमानपत्रांमध्ये किंवा अशा अन्य रीतीने प्रकाशित करवणे कायदेशीर ठरेल.

३०. (१) या कलमात यापुढे उपबंधित केले असेल तेवढे वगळता, या अधिनियमाखालील खटल्यात ज्या कीटनाशकाबाबत गुन्हा घडला त्याचे स्वरूप किंवा त्याची प्रत अथवा अशा कीटनाशकाची निर्मिती, विक्री किंवा वापर यामध्ये अंतर्भूत असणारा धोका अथवा त्याच्या निर्मितीची किंवा आयातीची परिस्थिती याबाबत आरोपी अनभिज्ञ होता एवढेच शाबीत करणे हा बचाव होणार नाही. **या अधिनियमाखालील खटल्यांमध्ये कोणते बचाव देता येतील किंवा देता येणार नाहीत.**

(२) (क) एखाद्या कीटनाशकाचे आकारमान, वजन किंवा माप वाढविण्यासाठी अथवा त्याची निकृष्ट प्रत किंवा अन्य दोष लपवण्यासाठी नव्हे तर, ने-आणीस किंवा वापरास योग्य अशा अवस्थेतील विक्रेय वस्तू म्हणून त्या कीटनाशकाची निर्मिती करण्याकरिता किंवा ते तयार करण्याकरिता आवश्यक असल्यामुळे एखादा निरुपद्रवी पदार्थ किंवा घटकद्रव्य त्यात घातलेले आहे ;

अथवा

(ख) निर्मितीची किंवा तयार करण्याची किंवा वाहतुकीची प्रक्रिया चालू असताना, एखाद्या बाह्य पदार्थाचे त्यात अपरिहार्यपणे संमिश्रण झालेले आहे ;

एवढ्याच कारणाने कलम १७ च्या प्रयोजनार्थ, ते कीटनाशक गैर छापाचे मानले जाणार नाही.

(३) कीटनाशकाचा आयातदार किंवा निर्माणक किंवा त्या कीटनाशकाच्या वितरणासाठी नेमलेला त्याचा अभिकर्ता नसलेल्या व्यक्तीने जर,—

(क) आयातदाराकडून किंवा रीतसर लायसन मिळालेल्या निर्माणकाकडून, वितरकाकडून किंवा विक्रेत्याकडून आपण कीटनाशक मिळवले आहे ;

(ख) त्या कीटनाशकामुळे या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण झालेले होते हे आपणास माहीत नव्हते व वाजवी तत्परता दाखवूनही आपण त्याबद्दल खात्री करून घेऊ शकलो नसतो ; आणि

(ग) ते कीटनाशक आपल्या कब्जात असताना, त्याची योग्य प्रकारे साठवण करण्यात आली होती व आपण ते मिळवले तेव्हा ते ज्या स्थितीत होते त्याच स्थितीत ते राहिले,

असे शाबीत केले तर, ती व्यक्ती या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केल्याबद्दल दायी होणार नाही.

३१. (१) या अधिनियमाखालील गुन्ह्याबद्दल कोणताही खटला राज्य शासनाखेरीज किंवा राज्य शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीखेरीज किंवा त्यांच्या लेखी संमतीखेरीज कोणालाही भरता येणार नाही. **गुन्ह्यांची दखल घेणे व संपरीक्षा.**

(२) [1][महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी] यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ दर्जाचे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही गुन्ह्याची संपरीक्षा करणार नाही.

३२. [वाढीव शिक्षा लादण्याची दंडाधिकाऱ्याची शक्ती.] १९७७ चा अधिनियम २४-कलम ८ द्वारे गाळले.

३३. (१) जेव्हा जेव्हा एखाद्या कंपनीने या अधिनियमाखाली गुन्हा केलेला असेल तेव्हा, गुन्हा घडला त्यावेळी कंपनीच्या कामकाज-चालनाची जी प्रभारी असेल किंवा त्याबद्दल कंपनीला जी जबाबदार असेल ती प्रत्येक व्यक्ती व तसेच कंपनीही, त्या गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास ती पात्र ठरेल : **कंपन्यांनी केलेले गुन्हे.**

परंतु, गुन्हा आपल्या नकळत घडला किंवा असा गुन्हा घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे वाजवी तत्परता दाखवली होती असे जर अशा कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती या अधिनियमाखाली कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

---

१. १९७७ चा अधिनियम २४—कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या कंपनीने या अधिनियमाखाली गुन्हा केला असेल व कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने गुन्हा करण्यात आला आहे किंवा त्याच्याकडून झालेल्या हलगर्जीपणाशी त्या गुन्ह्याचा कारण-संबंध जोडता येण्यासारखा आहे हे शाबीत करण्यात आले असेल त्याबाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा देखील त्या गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, कोणताही निगम-निकाय असा आहे व त्यामध्ये पेढीचा किंवा अन्य व्यक्तिसंघाचा समावेश आहे; व

(ख) " संचालक " याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

**निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती.**

३४. या अधिनियमाच्या उपबंधांपैकी किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा आदेशाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी जे निदेश आवश्यक असल्याचे केंद्र शासनाला दिसून येईल असे निदेश केंद्र शासन त्या राज्य शासनास देऊ शकेल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.**

३५. या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही कारवाईबद्दल शासन किंवा शासनाचा कोणताही अधिकारी किंवा मंडळ, नोंदणी समिती किंवा मंडळाची कोणतीही समिती यांच्याविरुद्ध कोणताही खटला किंवा अन्य कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**नियम करण्याची केंद्र शासनाची शक्ती.**

३६. (१) केंद्र शासनाला, या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ नियम करावयाचे असल्यास, मंडळाचा विचार घेतल्यानंतर व पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ते नियम करता येतील :

परंतु, याप्रमाणे विचार घेतल्याशिवाय नियम करणे आवश्यक आहे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे असे केंद्र शासनाचे मत झाले तर, मंडळाचा विचार घेतला नाही तरी चालू शकेल, पण, अशा बाबतीत नियम करण्यात आल्यापासून सहा महिन्यांच्या आत, मंडळाचा विचार घेण्यात येईल व उक्त नियमांच्या विशोधनासंबंधात मंडळाकडून ज्या कोणत्याही सूचना करण्यात येतील त्या केंद्र शासन विचारात घेईल.

(२) विशेषतः व पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील गोष्टी विहित करता येतील :—

(क) आवेष्टनाची व लेबल लावण्याची पद्धत;

(ख) कीटनाशकाची नोंदणी करण्याची रीत;

(ग) मंडळाची व नोंदणी समितीची कार्ये आणि मंडळ, नोंदणी समिती व मंडळाची कोणतीही समिती यांच्या सदस्यांना प्रदेय असलेला प्रवास भत्ता व इतर भत्ते;

(घ) ज्या ठिकाणी कीटनाशकांची आयात करता येईल अशी ठिकाणे व अन्य कोणत्याही ठिकाणी त्यांची आयात करण्यास मनाई;

(ङ) कीटनाशकाच्या नोंदणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व त्यासंबंधीचा तपशील;

(च) [1]* * * नोंदणीबाबत द्यावी लागणारी फी;

(छ) कलम १० खाली केंद्र शासनाकडे अपील करण्याची रीत व त्यासाठी द्यावी लागणारी फी;

(ज) लायसन दिले जावे यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व त्यासंबंधीचा तपशील;

(झ) लायसनाचा नमुना, त्याच्याशी संलग्न असलेल्या शर्ती व त्यासाठी द्यावी लागणारी फी;

(ञ) किती मुदतीसाठी लायसनाचे नूतनीकरण करता येईल व अशा नूतनीकरणाची फी;

(ट) कोणत्या परिस्थितीमध्ये कलम १४–पोटकलम (२) खाली लायसनामध्ये बदल किंवा विशोधन करता येईल;

(ठ) केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळेची कार्ये;

(ड) कीटनाशकीय विश्लेषक व कीटनाशकीय निरीक्षक यांच्या अर्हता, शक्ती व कामे;

(ढ) कोणत्याही कीटनाशकाच्या नमुन्यांची परीक्षा किंवा विश्लेषण करण्याची रीत व त्यासाठी द्यावी लागणारी फी;

(ण) ज्या व्यक्तीकडून परीक्षेसाठी किंवा विश्लेषणासाठी कीटनाशकाचा नमुना घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस कलम २२–पोटकलम (५) खाली कीटनाशकीय निरीक्षकाकडून कोणत्या नमुन्यात सूचना देण्यात येईल;

(त) कलम २४–पोटकलम (१) खाली कीटनाशकीय विश्लेषक कीटनाशकीय निरीक्षकास आपण केलेल्या परीक्षेचा किंवा विश्लेषणासंबंधीचा अहवाल कोणत्या नमुन्यात सादर करील;

---

१. १९७७ चा अधिनियम २४–कलम ९ द्वारे गाळले.

(थ) कीटनाशकांची निर्मिती, ते घटकपाठानुसार तयार करणे, त्यांची वाहतूक, त्यांचे वितरण वा त्यांचे उपयोजन चालू असताना कामगारांनी वापरावयाचे संरक्षक कपडे व साधनसामग्री आणि त्यांना स्वतःला व त्यांना पुरवण्यात येणाऱ्या वस्तूंना कोणत्याही संसर्गापासून दूर ठेवण्यासाठी उपलब्ध करून द्यावयाच्या इतर सुविधा;

(द) कामगारांनी अशा कोणत्याही संरक्षक कपड्यांचा, साधनसामग्रीचा वापर करणे व इतर सुविधांचा फायदा घेणे;

(ध) कीटनाशकांचा वापर करण्याने किंवा ती हाताळण्याने होणाऱ्या विषबाधेसंबंधी घ्यावयाची खबरदारी;

(न) विषबाधा झाली असेल अशी प्रकरणे शोधून काढण्यासाठी व त्यांच्या अन्वेषणासाठी उपाययोजना;

(प) प्रथमोपचार खात्रीपूर्वक मिळण्यासाठी उपलब्ध करून द्यावयाच्या सुविधा;

(फ) कामगारांना, त्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना पुरविण्यात येणाऱ्या वस्तूंच्या वापरासंबंधी द्यावयाच्या सूचना व प्रशिक्षण;

(ब) कीटनाशकांची निर्मिती करणाऱ्या किंवा ती हाताळणाऱ्या कामगारांची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी सुविधा;

[१]* * * *

(म) कीटनाशकाचे उपयोजन करण्याची साधनसामग्री व त्यासंबंधीची पद्धती आणि अशा रीतीने त्यांचे उपयोजन करण्यात आल्यावर उरलेली अतिरिक्त सामग्री, टाकाऊ पदार्थ व पात्रे यांची विल्हेवाट;

(य) अभिलेख व प्रतिवेदन ठेवणे व त्यांची तपासणी करणे;

(यक) वाहतूक चालू असताना किंवा एरव्ही अन्नपदार्थांसोबत कीटनाशकाची साठवण करण्यावरील निर्बंध;

(यख) घरगुती वापरासाठी तयार केलेल्या कोणत्याही सिद्धपदार्थात जे कीटनाशक घालण्यात येते किंवा जे त्यात अंतर्भूत असते त्याचे कमाल प्रमाण व त्यावरील निर्बंध;

(यग) कीटनाशकाच्या नोंदणीस नकार देण्यात आल्याचे किंवा त्याचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द केल्याचे कोणत्या रीतीने कळवावयाचे;

(यघ) केंद्र शासन या अधिनियमाद्वारे त्यास प्रदान करण्यात आलेल्यांपैकी कोणत्याही शक्ती व कार्ये कोणत्या अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे सोपवू शकेल;

(यङ) जी विहित करावयाची आहे किंवा विहित केली जाईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखाली केंद्र शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा [२][दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे] मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि [२][पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर] त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित स्वरूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.**

३७. (१) राज्य शासनाला या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करावयाचे झाल्यास, मंडळाचा विचार घेतल्यानंतर व पूर्वप्रकाशनाच्या शर्तींच्या अधीनतेने, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि केंद्र शासनाने काही नियम केले असल्यास त्यांच्याशी विसंगत नसतील असे नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येईल, त्या अशा :—

(क) कोणत्या प्राधिकरणाकडे व कोणत्या रीतीने व किती फी दिल्यावर कलम १५ खाली अपील दाखल करता येईल ते आणि अपिलाचा निकाल करताना अपील प्राधिकरणाने अनुसरावयाची प्रक्रिया ;

(ख) या अधिनियमाद्वारे राज्य शासनास प्रदान करण्यात आलेल्यांपैकी कोणत्याही शक्ती व कामे ही उक्त शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे सोपविणे.

**सूट.**

३८. (१) (क) कोणत्याही व्यक्तीने आपल्या स्वतःच्या घरगुती कामांसाठी किंवा परसमळ्यासाठी किंवा आपल्या कसवटीखालील कोणत्याही जमिनीबाबत केलेला कोणत्याही कीटनाशकाचा वापर;

---

१. १९७७ चा अधिनियम २४—कलम ९ द्वारे खंड (भ) गाळला.
२. कित्ता—कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(ख्) अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेला किंवा समाविष्ट असलेला कोणताही पदार्थ अथवा असा कोणताही एक किंवा अनेक पदार्थ अंतर्भूत असलेला सिद्धपदार्थ, माणसांना उपयुक्त नसणारे कोणतेही कीट, कृंतक, अळंबी, तण व इतर प्रकारची वनस्पती किंवा जीवजंतू यांस आळा घालणे, त्यांचा नाश करणे, त्यांचे निवारण करणे किंवा त्यांपासून होणारा उपद्रव सौम्य करणे यांहून अन्य प्रयोजनासाठी योजलेला असल्यास असा पदार्थ किंवा सिद्धपदार्थ,

यांना या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

(२) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, व तीमध्ये त्याने काही शर्ती विनिर्दिष्ट केल्यास अशा शर्तींच्या अधीनतेने, कीटनाशकांसंबंधीचे प्रयोग करण्याच्या कामी गुंतलेल्या कोणत्याही शैक्षणिक, वैज्ञानिक किंवा संशोधन संघटनेला या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधातून किंवा त्याखाली केलेल्या नियमांतून सूट देऊ शकेल.

## अनुसूची

### कलम ३ (ड) पहा

### कीटनाशकांची सूची

ॲक्रिलोनायट्राईल
ॲल्ड्रिन (१ : २ : ३ : ४ : १० : १०—हेक्झाक्लोरा—१ : ४ : ४-ए ; ५ : ८ ; ८ए-हेक्झाहायड्रो—१ : ४ : ५ : ८- डायमेथानॉनॲफथालिन)
ॲलेथ्रिन (ॲलिल होमोलॉग ऑफ सिनेरीन—एक)
ॲल्युमिनिअम फॉस्फाइड
ॲमिटॉन
ॲन्टू (अल्फा—नॅपथाईल थिऑरिया)
बॅरामाइट [२ (पीन्टटर्ट—बुटीलफेनॉक्झी) इस्प्रॉपिल १—२ क्लोरोइथिल सल्फाइट].
बेरिअम कारबोनेट
बेरिअम फ्लूरो सिलिकेट
बीएचसी (बेन्झीन हेक्झाक्लोराइड) (१, २, ३, ४, ५, ६—हेक्झाक्लोरोहेक्झेन)
बिस—डायमेथिलॅमिनो फ्लोरोफॉस्फाइन ऑक्साईड
कॅलशिअम अर्सिनेट
कॅलशिअम सायनाइड
कॅप्तान (एन—ट्रायक्लोरोमेथिलमरकॅप्टो—४—सायक्लोहेक्झन), १, २—डिसकारबॉक्सामाईड
कारबॅरील (१—नेफायिल—एन—मेथिल कारबोनेट)
कारबन डायसल्फाइड
कारबन टेट्राक्लोराईड
क्लोरबेनसाईड (पी—क्लोरोबेन्झील—पी—क्लोरो फेनिल सल्फाइड)
क्लोरोबायस इथिल ॲमिनो ट्रायाझिन
क्लोरडेन (१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ८—ऑक्टॅक्लोअर—२, ३, ३-ए, ४, ७, ७-ए, हेक्सा—हायड्रो ४, ७—मेथानॉइन्डेन)
क्लोरोबेन्झिलेट (इथिल ४, ४—डायक्लोरोबेन्झिलेट)
क्लोरोथिअन (ओ, ओ—डायमेथिल—ओ—३क्लोरो—४ नायट्रोफेनिल थिऑनो फॉस्फेट)
क्लोरो—आय.पी.सी.
क्लोरोपिक्रिन
क्लोरोफेन्सन (पी—क्लोरोफेनिल—पी—क्लोरोबेन्झीन सल्फोनेट) एस—(पी—क्लोरोफेनिलथिओ) मेथील—ओ—ओ—डायायिल फॉस्फोरोडिथिओएट (ट्रीथिऑन)
सीआयपीसी [आयसोप्रॉपिल—एन (३—क्लोरोफेनिल) कारबामेट]
सीएमयू (मॅन्यूरॉन)
कॉपर अर्सनेट
कॉपर सायनाइड
कॉपर नॅफथानेट
कॉपर सल्फेट
कौमाक्लोअर [३—(ए—असेटॉनिल—४—क्लोरोबेन्झील—४—हायड्रॉक्सी कॉमारिन)]
कॉपर ऑक्सिक्लोराइड
क्यूप्रस ऑक्साईड
डालापॉन (सोडिअम २, २ डायक्लोरोप्रॉपिऑनेट)
डी. डी मिक्स्चर
डीडीडी (डायक्लोरो डायफेनिल डायक्लोरोएथेन)
डीडीटी [ए मिक्स्चर ऑफ १, १, १—ट्रायक्लोरो—२, २—बिस (पी—क्लोरोफेनिल) इथेन ॲण्ड १, १, १—ट्रायक्लोरो—२—(ओ—क्लोरोफेनिल)—२ (पी—क्लोरोफेनिल) इथेन]
डीडीव्हीपी (२, २—डायक्लोरोव्हीनील डायमेथिल फॉस्फेट)
डेमेटॉन—ओ (ओ, ओ—डीएथिल—एस [(२)—एथिलथिओ]—एथिल) फास्फोरोथिओएट)
डेमेटॉन—एस '(ओ, ओ—डीएथिल—एस [(२)—एथिलथिओ]—एथिल) फास्फोरोथिओएट)
डायाझिनॉन (ओ, ओ—डी एथिल—ओ [२ आयसॉप्रोपिल—६ मेथिल—४—पायरीमिडीनिल] फास्फोरोथिओएट)
डायब्रॉम (१, २—डायब्रोमो, २, २—डायक्लोरोइथिल डायमेथिल फॉस्फेट)
डायक्लोरोफेनॉक्सी ॲसेटिक ॲसिड (२, ४—डी)
डायल्ड्रिन ( १:२:३:४:१०:१०—हेक्झाक्लोरो—६:७-इपॉक्सी—१:४ए:५:५:६:७:८—८ए : ऑक्टॉहायड्रो—१:४:५:८—डायमेथानोनॲसथालीन)
डायमेथॉएट (ओ,ओ—डायमेथिल—एस—(एन—मेथिलकारबामॉईल मेथिल) फॉस्फोरॉडिथिओएट)
डिप्टरेक्स (ओ, ओ—डायमेथिल—२, २, २—ट्रायक्लोरो हायड्रॉक्सी एथिल फॉस्फोनेट)
डीएनओसी (डायनायट्रो—ऑरथो—कम्पाऊण्ड) (३:५—डायनायट्रो—ओ—क्रिसोल)
इडीसीटी मिक्स्चर (एथिलिन डायक्लोराईड कार्बन टेट्राक्लोराईड मिक्स्चर)
एकाटिन

**अनुसूची—चालू**

एन्ड्रिन (१, २, ३, ४, १०–१०–हेक्झाक्लोरो–६, ७– इपॉक्सी–१,
४, ४ए, ५, ६, ७, ८, आठ ए–ऑक्टॅहायड्रो–१, ४–इण्डोइण्डो, ५–८–डायमेथानोनएफथालिन)
इ. पी. एन. (ओ–इथिल–ओ–पी–नायट्रायफेनिल बेन्झीन थिआफॉस्फोनेट)
एथिऑक्सी एथिल मर्क्युरी क्लोराईड
एथिल डी–एन–प्रोप्राइलथिओलकार्बमेट (इप्टम)
एथिल मर्क्युरी फॉस्फेट
एथिल मर्क्युरी क्लोराईड
एथिलिन डायब्रोमाईड
इथिलिन डायक्लोराईड
फेनसॉन (पॅराक्लोरोफेनिल बेन्झीन सल्फोनेट)
फेन्थिऑन (३–मेथिल–४–मेथिल थिऑफेनिल फॉस्फोरोथिओनेट)
फेरबाम (फेरिक डायमेथिल डायथिओ कारबामेट)
गुसएथिऑन [ओ, ओ–डायमेथिलएस (४–ऑक्सो–१, २, ३–बेन्झॉट्रॉयाझिनिल–३–मेथिल) फॉस्फोरोथिओएट]
हॅप्टाक्लोअर (१, ४, ५, ६, ७, ८, ८–हेप्टाक्लोरो–४–७–मेथानो–३ ए, ४, ७, ७ए–टेट्राहायड्रोइन्डेन)
एचइटीपी (हेक्झाइथिल टेट्राफॉस्फेट)
हेक्झाक्लोरोबेन्झीन
हायड्रोजन सायनाईड
हायड्रोजन फॉस्फाईड
लेड अर्सेनेट
लाईम सल्फर (कॅलशिअम पॉलीसल्फाईड, वॉटरफ्री सल्फर, कॅलशिअम थिओसल्फेट मिक्स्चर)
लिन्डेन (गॅमा, बी. एच. सी.)
मालाथिऑन [एस–(१, २–बिस) (इथॉक्सीकारबोनिल) इथिल] ओ, ओ–डायमेथिल–फॉस्फोरो–
डायथिओएट)
मेलेइक हायड्राझाईड (१, २–डायहायड्रोपायरोपायरीडेझिन ३, ६–डिऑन)
मनेब मॅंगेनीज इथिलिन बिसडायथिओकार्बमेट
एमसीपीए–(४–क्लोरो–२ मेथिल फेनॉक्सी असेटीक ॲसिड)
मर्क्युरिक क्लोराईड
मेटलडीहाईड
मेटासीस्टॉक्स
मेथॉक्सीक्लोअर (१, १, १–ट्रायक्लोरो–२, २–डाय–पी–मॅथॉक्सीफेनिलइथेन)
मेथॉवी इथिल मर्क्युरी क्लोराईड
मेथिल ब्रोमाईड
मेथिल डीमेटॉन (डायमेटॉन–मेथिल ॲण्ड डायमेटॉन–मेथिल)
मेथिल मर्क्युरी क्लोराईड
मेथिल पॅराथिऑन (ओ, ओ–डायमेथिल–ओ–पी–नायट्रोफेनीलथिऑफॉस्फेट)
मेटॉक्स (क्लोरोसल्फीसाईड)
नाबाम (डायसोडिअम इथिलिन–१, २–बिस डिथिओकार्बमेट)
निकोटाईन सल्फेट
ऑक्टॅ मेथिल पायरोफॉस्फोरामाईड
पॅरा–डायक्लोरो बेन्झीन
पॅराथिऑन (ओ, ओ–डायइथिल–ओ–पी–नायट्रोफेनिलथिओफॉस्फेट)
पॅरिस ग्रीन (कॉपर असेटो असनाईट)
पेन्टाक्लोरोनायट्रोबेन्झीन (पी. सी. एन. बी.)
पेन्टाक्लोरोफिनॉल
फेनिल मर्क्युरी असेटेट
फेनिल मर्क्युरी क्लोराईड
फेनिल मर्क्युरी युरिआ
फॉसड्रिन
थॅलीमायडोमेथिल–ओ–ओ–डायमेथिल फॉस्फोरोडायथिओएट (एमिडान)
पायपरॉनिल ब्युटॉक्साईड (ब्युटील कार्बायटील) (६–प्रॉप्रिल पायपॅरॉनिल) इथर–ओ
पायवल (२–पायवलील–इण्डेन १–३–डीऑन)
पोटॅशिअम सायनाईड
एन–प्रॉपिल इथिल–एन–ब्युटील थिऑलकार्बामेट (टायलम)
पायरेथ्रिन्स (इनसेक्टिकली ॲक्टिव्ह प्रिन्सिपल्स ऑफ थ्रिसनथेमम सिनरेरियाफॉलिअम)
रोटेनॉन
रियानिया
सोडिअम फ्लुरोॲसिटेट
सोडियम सायनाईड

अनुसूची—चालू

सोडिअम फ्लुरो सिलिकेट
सल्फर (वेटेबल ऑर कोलोइडल सल्फर)
स्ट्रिचनाईन
सल्फॉक्साइड (१, २–मेथिलिन–डायॉक्सी–४ (२–ऑक्टिलसल्फायनील) प्रॉपिल बेन्झीन)
टीसीए (ट्रायक्लोअर असेटिक ॲसिड सोडिअम ॲण्ड अमोनिअम सॉल्टस्)
टेडिऑन (टेट्राक्लोअर डायफेनिल सल्फोन)
टीइपीपी (टेट्राइथिल पायरोफॉस्फेट)
टेट्राक्लोरो–पी–बेन्झोक्विनॉन
थानाईट
थिरम [बिस (डायमेथिल थिओकार्बामिल) डायसल्फाईड]
टॉलील मर्क्युरी असेटेट
ट्रायक्लोरोफोन
ट्रायऑर्थोक्रेसिल फॉस्फेट
थॅलिअम सल्फेट
थिओमेटन
टॉक्साफिन (क्लोरिनेटेड कॅम्पहेन कन्टेनिंग ६७–६९ टक्के क्लोरिन)
ट्रायक्लोरोफेनॉक्सी असेटिक ॲसिड (२, ४, ५–टी)
वारफॅरिन (३–ए–एसेटॉनिल बेन्झील–४–हायड्रॉक्सी–कोमॅरिन)
झिंक फॉस्फाईड
झिमेट
झिनेब (झिंक इथिलिन–बिस–डायथिओकारबामेट)
झिरम (झिंक डायमेथिल–डायथिओकारबामेट)
झ्युलेट

# THE INSECTICIDES ACT, 1968

## कीटनाशके अधिनियम, १९६८

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| adduce evidence | पुरावा सादर करणे | [S. 24(3)] |
| aggrieved | नाराज झालेला | [S. (10)] |
| alleged contravention | अभिकथित व्यतिक्रमण | [S. 21(1)(d)] |
| alternating | बदल करणे | [S. 3(j)(i)] |
| analyst's report | विश्लेषकाचा अहवाल | [S. 24(4)] |
| article of commerce | विक्रेय वस्तू | [S. 30(2)(a)] |
| attributable to | —शी कारणसंबंध जोडता येण्यासारखा | [S. 33(2)] |
| barrel | पिंप | [S. 3(1)] |
| batch | भट्टी | [S. 27(1)] |
| breaking up | विभागणी करणे | [S. 3(j)(i)] |
| bulk | आकारमान | [S. 30(2)(a)] |
| carriage | ने-आण | [S. 30(2)(a)] |
| carrier | परिवाहक | [S. 21(1)(b)] |
| case | खोका | [S. 3(1)] |
| casket | करंडक | [S. 3(1)] |
| caution | सावधान-सूचना | [S. 3(k)(iii)] |
| Central Committee for Food Standards | अन्न मानकविषयक केंद्रीय समिती | [S. 4(3)(xiii)] |
| Central Insecticides Board | केंद्रीय कीटनाशकीय मंडळ | [S. 3(b)] |
| Central Insecticides Laboratory | केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळा | [S. 3(c)] |
| Chairman | अध्यक्ष | [S. 4(3)(i)] |
| Chief Adviser of Factories | मुख्य सल्लागार, कारखाने | [S. 4(3)(v)] |
| come within the cognizance of | —च्या निदर्शनास येणे | [S. 26)] |
| conform to | —शी मिळते-जुळते असणे | [S. 9(3)] |
| contamination | संसर्ग | [S. 36(2)(q)] |
| contents | आतील वस्तू | [S. 3(k)(i)] |
| conveyance | वाहतूक | [S. 30(2)(b)] |
| co-opt | स्वीकृत करणे | [S. 5(4)] |
| Council of Scientific & Industrial Research | वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषद | [S. 4(3)(xx)] |
| cultivation | कसवट | [S. 38(1)(a)] |
| Deputy Director General of Shipping | उप महा संचालक, नौवहन | [S. 4(3)(xi)] |
| design | आकृति | [S. 3(k)(i)] |
| deteriorate | खराब होणे | [S. 22(5)proviso] |
| Director General of Health Services | महा संचालक, आरोग्य सेवा | [S. 4(3)(i)] |
| Director General of Shipping | महा संचालक, नौवहन | [S.4(3)(xi)] |
| Director of Storage & Inspection | संचालक, साठवण व निरीक्षण | [S. 4(3)(iv)] |
| Drugs Controller | औषध नियंत्रक | [S. 4(3)(ii)] |
| due diligence | वाजवी तत्परता | [S.33(1)proviso] |
| ecologist | पारिस्थितिकीतज्ञ | [S. 4(3)(xxi)] |
| effectively seal | पक्के मोहोरबंद करणे | [S. 22(5)] |
| efficacy | गुणकारिता | [S. 5(1)(i)] |
| enhanced | वाढीव | [S. 32 mn.] |
| entertain | विचारार्थ स्वीकारणे | [S.10-proviso] |
| essential fact | सारभूत तथ्य | [S. 14(1)(a)] |
| except under or in accordance with | —च्या अन्वये किंवा—ला अनुसरून नव्हे तर अन्यथा | [S. 17(2)] |
| exercise (functions) | कार्याधिकार वापरणे | [S. 16-proviso] |
| financial interest | आर्थिक हितसंबंध | [S. 19-proviso] |
| finishing | परिष्कृत करणे | [S. 3(j)(i)] |
| fish and fowl | मासे आणि कुक्कुटादी पक्षी | [S. 3(a)] |

| | | |
|---|---|---|
| formulae | घटकपाठ | [S. 5(1)(i)] |
| formulate | घटकपाठानुसार तयार करणे | [S. 3(j)(ii)] |
| formulation | घटकपाठानुसार तयार करणे | [S. 36(2)(q)] |
| function | कार्याधिकार | [S. 16-proviso] |
| fungi | अळंबी | [S. 38(1)(b)] |
| fungicides | बुरशीनाशके | [S. 3(e)(ii)] |
| graphic | आलेखित | [S. 3(k)(iv)] |
| graphic matter | आलेखित मजकूर | [S. 3(h)] |
| graphic representation | आलेखित प्रतिरूपण | [S. 3(k)(j)] |
| importer | आयातदार | [S.5(1)(i)] |
| in derogation of | ---ला न्यूनकारी | [S. 2] |
| Indian Council of Agricultural Research | भारतीय कृषि संशोधन परिषद | [S. 4(3)(vii)] |
| Indian Council of Medical Research | भारतीय वैद्यक संशोधन परिषद | [S. 4(3)(viii)] |
| Indian Standards Institution | भारतीय मानक संस्था | [S. 4(3)(x)] |
| in excess of one's power | आपल्या शक्तीचा अतिक्रम करून | [S. 32-m.n.] |
| ingredient | घटकद्रव्य | [S. 30(2)(a)] |
| innocuous | निरुपद्रवी | [S. 30(2)(a)] |
| in one's discretion | स्वविवेकानुसार | [S. 24(4)] |
| Insecticide Analyst | कीटनाशकीय विश्लेषक | [S. 3(f)] |
| Insecticide Inspector | कीटनाशकीय निरीक्षक | [S. 3-9] |
| intermix | संमिश्रण होणे | [S. 30(2)(b)] |
| in token of | ---चे प्रमाण म्हणून | [S. 9(3)] |
| kitchen garden | परसमळा | [S. 38(1)(a)] |
| liable | १ पात्र | [S. 25(1)] |
| | २ दायी | [S. 30(3)] |
| licensing officer | लायसन अधिकारी | [S. 12-m.n.] |
| make up | बांधून ठेवणे | [S. 22(5)-proviso] |
| manufacture | निर्मिती | [long title] |
| manufacturer | निर्माणक | [S. 5(1)(i)] |
| medical toxicologist | वैद्यकीय विषशास्त्रज्ञ | [S. 4(3)(xvi)] |
| misbranded | गैर छापाचे | [S. 3(k)] |
| mitigate | (उपद्रव) सौम्य करणे | [S. 37(1)(b)] |
| National Institute of Communicable Diseases | राष्ट्रीय सांक्रामिक रोग संस्था | [S. 4(3)(vi)] |
| observe precautions | खबरदारी घेणे | [S. 9(3)-2nd proviso] |
| occupational hazards | व्यवसायविषयक जोखिमा | [S. 4(3)(xix)] |
| occurrences of poisoning | विषबाधेच्या घटना | [S. 26] |
| offer | प्रस्ताव करणे | [S. 3(p)] |
| officially subordinate | पदपरत्वे दुय्यम | [S. 20(2)] |
| package | आवेष्टन | [S. 3(1)] |
| packing | आवेष्टित करणे | [S. 3(j)(i)] |
| pharmacologist | भेषजवैज्ञानिक | [S. 4(3)(xv)] |
| plant or animal life | वनस्पती किंवा जीवजंतू | [S. 38(1)(b)] |
| Plant Protection Adviser | रोप संरक्षण सल्लागार | [S. 4(3)(iii)] |
| preparation | *vb.* तयार करणे | [S. 30(2)(a)] |
| | *n.* सिद्ध पदार्थ | [S. 3(e)(iii)] |
| prevent a risk | धोका टाळणे | [long title] |
| reasonable diligence | वाजवी तत्परता | [S. 30(3)(b)] |
| Registration Committee | नोंदणी समिती | [S. 5-m.n.] |
| registration number | नोंदणी क्रमांक | [S. 3(k)(vii)] |
| release | मुक्त करणे | [S. 22(2)(c)] |
| remedy (the defect) | (दोष) दुरुस्त करणे | [S. 22(2)(c)] |
| repel | निवारण करणे | [S. 38(1)(b)] |
| report | १. अहवाल | [S. 24-m.n.] |
| | २. वृत्त | [S. 27(2)] |
| retail business | किरकोळ विक्री-धंदा | [S. 3-(j)-(i)] |
| retain | ठेवून घेणे | [S. 22(6)] |
| return | प्रतिवेदन | [S. 36(2)(z)] |
| rodents | कृंतक | [S. 38(1)(b)] |

| | | |
|---|---|---|
| stall | ठेला | [S. 3(m)] |
| statement | विधान | [S. 3(k)(iv)] |
| suitably mark | योग्य प्रकारे चिन्हांकित करणे | [S. 22(5)] |
| technical staff | तंत्रकुशल कर्मचारीवर्ग | [S. 8(ii)] |
| tin | डबा | [S. 3(1)] |
| toxicity | विषार | [S. 3(k)(viii)] |
| transport and shipping | परिवहन व नौवहन | [S. 4(3)(xi)] |
| use all despatch | शक्य तितकी तत्परता दाखवणे | [S. 22(2)(a)] |
| volume | आकार | [S. 22(5)-proviso] |
| weedicides | तणनाशके | [S. 3(e)(ii)] |
| weeds | तण | [S. 38(1)(b)] |
| wild life | वन्य जीव | [S. 3(a)] |
| with the consent or connivance of | –च्या संमतीने किंवा मूकानुमतीने | [S. 33(2)] |
| wrapper | वेष्टन | [S. 3(1)] |
| Zoological Survey of India | भारतीय प्राणिशास्त्रीय सर्वेक्षण | [S. 4(3)(ix)] |

# कीटनाशके अधिनियम, १९६८

## INSECTICIDES ACT, 1968

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | chairman | [S. 4(3)(i)] |
| अन्न मानकविषयक केंद्रीय समिती | Central Committee for Food Standards | [S. 4(3)(xiii)] |
| अभिकथित व्यतिक्रमण | alleged contravention | [S. 21(1)(d)] |
| अभिग्रहण | seizure | [S. 21(2)] |
| अहवाल | report | [S. 24-m.n.] |
| अळंबी | fungi | [S. 38(1)(b)] |
| आकार | volume | [S. 22(5)-proviso] |
| आकारमान | bulk | [S. 30(2)(a)] |
| आकृति | design | [S. 3(k)(i)] |
| आतील वस्तू | contents | [S. 3(k)(i)] |
| आपल्या शक्तीचा अतिक्रम करून | in excess of one's power | [S. 32-m.n.] |
| आयातदार | importer | [S. 5(1)(i)] |
| आर्थिक हितसंबंध | financial interest | [S. 19-proviso] |
| आलेखित | graphic | [S. 3(k)(iv)] |
| आलेखित प्रतिरूपण | graphic representation | [S. 3(k)(i)] |
| आलेखित मजकूर | graphic matter | [S. 3(b)] |
| आवेष्टन | package | [S. 3(1)] |
| आवेष्टित करणे | packing | [S. 3(j)(i)] |
| उप महासंचालक, नौवहन | Deputy Director-General of Shipping | [S. 4(3)(xi)] |
| औषध नियंत्रक | Drugs Controller | [S. 4(3)(ii)] |
| करंडक | casket | [S. 3(1)] |
| कसवट | cultivation | [S. 38(1)(a)] |
| कार्याधिकार | function | [S. 16-proviso] |
| कार्याधिकार वापरणे | exercise (functions) | [S. 16-proviso] |
| किरकोळ विक्रीधंदा | retail business | [S. 3(j)(i)] |
| कीटनाशकीय निरीक्षक | Insecticide Inspector | [S. 3(g)] |
| कीटनाशकीय विश्लेषक | Insecticide Analyst | [S. 3(f)] |
| कृंतक | rodents | [S. 38(1)(b)] |
| केंद्रीय कीटनाशकीय प्रयोगशाळा | Central Insecticides Laboratory | [S. 3(c)] |
| केंद्रीय कीटनाशकीय मंडळ | Central Insecticides Board | [S. 3(b)] |
| खबरदारी घेणे | observe precautions | [S. 9(3)-2nd proviso] |
| खराब होणे | deteriorate | [S. 22(5)-proviso] |
| खोका | case | [S. 3(1)] |
| गुणकारिता | efficacy | [S. 5(1)(i)] |
| गैर छापाचे | misbranded | [S. 3(k)] |
| घटकद्रव्य | ingredient | [S. 30(2)(a)] |
| घटकपाठ | formulae | [S. 5(1)(i)] |
| घटकपाठानुसार तयार करणे | 1. formulate | [S. 3(j)(ii)] |
| | 2. formulation | [S. 36(2)(9)] |
| —चे प्रमाण म्हणून | in token of | [S. 9(3)] |
| —च्या अन्वये किंवा—ला अनुसरून | except under or in accordance with | [S. 17(2)] |
| —च्या निदर्शनास येणे | come within the congnizance of | [S. 26] |
| —च्या संमतीने किंवा मूकानुमतीने | with the consent or connivance of | [S. 33(2)] |
| ठेला | stall | [S. 3(m)] |
| ठेवून घेणे | retain | [S. 22(6)] |
| डबा | tin | [S. 3(1)] |
| तण | weeds | [S. 38(1)(b)] |
| तणनाशके | weedicides | [S. 3(e)(ii)] |
| तत्परता | despatch | [S. 22(2)(a)] |
| तंत्रकुशल कर्मचारीवर्ग | technical staff | [S. 3(ii)] |
| तयार करणे | preparation | [S. 30(2)(a)] |
| (दोष) दुरुस्त करणे | remedy (the defect) | [S. 22(2)(c)] |

| | | |
|---|---|---|
| धोका टाळणे | prevent a risk | [long title] |
| नाराज झालेला | aggrieved | [S. 10] |
| निरुपद्रवी | innocuous | [S. 30(2)(a)] |
| निर्माणिक | manufacturer | [S. 21(1)(b)] |
| निर्मिति | manufacture | [long title] |
| निवारण करणे | repel | [S. 38(1)(b)] |
| ने-आण | carriage | [S. 30(4)(a)] |
| नोंदणी क्रमांक | registration number | [S. 3(k)(vii)] |
| नोंदणी समिती | Registration Committee | [S. 5-m.n.] |
| पक्के मोहोरबंद करणे | effectively seal | [S. 22(5)] |
| पदपरत्वे दुय्यम | officially subordinate | [S. 2(2)] |
| परसमळा | kitchen garden | [S. 38(1)(a)] |
| परिवहन व नौवहन | Transport and Shipping | [S. 4(3)(xi)] |
| परिवाहक | carrier | [S. 21(1)(b)] |
| परिष्कृत करणे | finishing | [S. 3( j )(i)] |
| परीक्षा | test | [S. 21(1)(e)] |
| परीक्षा करणे | test | [S. 36(2)(4)] |
| पात्र | *n.* 1. receptacle | [S. 3(1)] |
| | *adj.* liable | [S. 25(1)] |
| पारिस्थितिकीतज्ञ | ecologist | [S. 4(3)(xxi)] |
| पिंप | barrel | [S. 3(1)] |
| पुरावा सादर करणे | adduce evidence | [S. 24(3)] |
| प्रतिवेदन | return | [S. 36(2)(z)] |
| प्रस्ताव करणे | offer | [S. 3(p)] |
| बदल करणे | alternating | [S. 3(j)(i)] |
| बुरशीनाशके | fungicides | [S. 3(e)(ii)] |
| भट्टी | batch | [S. 27(1)] |
| बांधून ठेवणे | make up | [S. 22(5)-proviso] |
| भारतीय कृषि संशोधन परिषद | Indian Council of Agricultural Research | [S. 4(3)(vii)] |
| भारतीय प्राणिशास्त्रीय सर्वेक्षण | Zoological Survey of India | [S. 4(3)(ix)] |
| भारतीय मानक संस्था | Indian Standards Institution | [S. 4(3)(x)] |
| भारतीय वैद्यक संशोधन परिषद | Indian Council of Medical Research | [S. 4(3)(viii)] |
| भेषजवैज्ञानिक | pharmacologist | [S. 4(3)(xv)] |
| महा संचालक, आरोग्य सेवा | Director General of Health Services | [S. 4(3)(i)] |
| महा संचालक, नौवहन | Director General of Shipping | [S. (4)(3)(xi)] |
| मासे व कुक्कुटादी पक्षी | fish and fowl | [S. 3(a)] |
| मुक्त करणे | release | [S. 22(2)(c)] |
| मुख्य सल्लागार, कारखाने | Chief Adviser of Factories | [S. 4(3)(v)] |
| योग्य प्रकारे चिन्हांकित करणे | suitably mark | [S. 22(5)] |
| राष्ट्रीय सांक्रामिक रोग संस्था | National Institute of Communicable Diseases | [S. 4(3)(vi)] |
| रोप संरक्षण सल्लागार | Plant Protection Adviser | [S. 4(3)(iii)] |
| —ला न्यूनकारी | in derogation | [S. 2] |
| लायसन अधिकारी | licensing officer | [S. 2-m.n.] |
| वनस्पती किंवा जीवजंतू | plant or animal life | [S. 38(1)(b)] |
| वन्य जीव | wild life | [S. 3(a)] |
| वाजवी तत्परता | 1. reasonable diligence | [S. 30(3)(b)] |
| | 2. due diligence | [S. 33(1)-proviso] |
| वाढीव | enhanced | [S. 32-m.n.] |
| वापर | consumption | [S. 30(2)(a)] |
| वाहतूक | conveyance | [S. 30(2)(b)] |
| विक्रेय वस्तू | article of commerce | [S. 30(2)(a)] |
| विचारार्थ स्वीकारणे | entertain | [S. 10-proviso] |
| विधान | statement | [S. 3(k)(iv)] |
| विभागणी करणे | breaking up | [S. 3(j)(i)] |
| विश्लेषकाचा अहवाल | analyst's report | [S. 24(4)] |
| विषबाधेच्या घटना | occurences of poisoning | [S. 26] |
| विषार | toxicity | [S. 3(k)(viii)] |

| | | |
|---|---|---|
| वृत्त | report | [S. 27(2)] |
| वेष्टन | wrapper | [S. 3(i)] |
| वैद्यकीय विषशास्त्रज्ञ | medical toxicologist | [S. 4(3)(xvi)] |
| वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषद | Council of Scientific and Industrial Research | [S. 4(3)(xx)] |
| व्यवसायविषयक जोखिमा | occupational hazards | [S. 4(3)(xix)] |
| शक्य तितकी तत्परता दाखवणे | use all despatch | [S. 22(2)(a)] |
| —शी कारणसंबंध जोडता येण्यासारखा | attributable to | [S. 33(2)] |
| —शी मिळतेजुळते असणे | conform to | [S. 9(3)] |
| संचालक, साठवण व निरीक्षण | Director of Storage & Inspection | [S. 4(3)(iv)] |
| —च्या संमतीने किंवा मूकानुमतीने | with the consent or connivance of | [S. 33(2)] |
| संमिश्रण होणे | intermix | [S. 30(2)(b)] |
| संसर्ग | contamination | [S. 36(2)(g)] |
| सारभूत तथ्य | essential fact | [S. 14(1)(a)] |
| सावधान–सूचना | caution | [S. 3(k)(iii)] |
| सिद्ध पदार्थ | preparation | [S. 3(e)(iii)] |
| (उपद्रव) सौम्य करणे | mitigate | [S. 37(1)(b)] |
| स्वविवेकानुसार | in one's discretion | [S. 24(4)] |
| स्वीकृत करणे | co-opt | [S. 5(4)] |